# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२२

-----------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२ / अग्रहायण ३०, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व औषध प्रशासन मंत्री** | |
| **(३)** | **उद्योग मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(५)** | **शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | |

-------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ४६**

-------------------------------------

### राज्यात टीईटी परीक्षेत झालेला गैरप्रकार

**(१) * ५०४९१ श्री.अजित पवार (बारामती), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात टीईटी परीक्षेत गैरप्रकार करुन प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या शिक्षकांच्या मान्यता आणि शालार्थ आयडी रद्द करण्याची कार्यवाही त्वरित करावी असे लेखी आदेश शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान उप संचालकांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १९ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास घेण्यात आलेल्या टीईटी परिक्षेत गैरप्रकार करणाऱ्या शिक्षकांची यादी विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित शिक्षकांवर ६० दिवसात सुनावणी घेवून कारवाई करण्याचे आदेश असतानाही सदर कारवाईस जाणीवपूर्वक विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) याबाबत दाखल रिट याचिकांमध्ये मा. न्यायालयाने पुढील आदेश होईपर्यंत संबंधितांवर कारवाई करु नये, असे अंतरिम आदेश दिले आहेत. तथापि, सर्व न्यायालयीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### शालेय पोषण आहारासाठी विद्यार्थ्यांचे आधारकार्ड शाळेशी लिंक करण्याबाबत

**(२) * ५०३५४ श्री.संजय बनसोडे (उदगीर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात**

**(संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या आदेशानुसार शालेय पोषण आहारासाठी दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत विद्यार्थ्यांचे आधारकार्ड शाळेशी लिंक करणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्ह्यात एकूण ४ लाख ८४ हजार ६५८ विद्यार्थी असून त्यापैकी ३ लाख ८४ हजार ३५३ विद्यार्थ्यांनी त्यांच्या शाळांमध्ये आधारकार्ड लिंक केले असून अद्यापही १ लाख ३०५ विद्यार्थ्यांचे आधारकार्ड तांत्रिक अडचणींमुळे लिंक झाले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आधारकार्डसाठी जिल्हयात फक्त ५५ मशीन्स व तालुक्याच्या ठिकाणी एक ते दोन आधार केंद्र असून दररोज केवळ ४० व्यक्तींचे आधारकार्ड काढता येत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे आधारकार्ड विहित मुदतीत लिंक करण्यास अनेक अडचणी येत असल्यामुळे विद्यार्थी शालेय पोषण आहारापासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आधारकार्ड सक्तीचे केल्यामुळे प्रत्येक शाळा किंवा केंद्र स्तरावर आधार नोंदणीची तसेच लिंक सुविधा शासनाने उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी विद्यार्थी व पालकांकडून होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

वित्त विभागाच्या दि.०८ जून, २०२२ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील विविध योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व लाभार्थ्यांची दि.३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत आधार नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

लातूर जिल्ह्यात प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत एकूण २ लाख ९१ हजार ८६६ लाभार्थी आहेत. सदर लाभार्थ्यांपैकी २ लाख ६३ हजार ६५९ विद्यार्थ्यांनी आधार नोंदणी केलेली आहे. उर्वरित लाभार्थ्यांची आधार नोंदणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील लाभार्थ्यांना आधार नोंदणी नसणे किंवा आधार कार्ड लिंक नसल्यामुळे योजनेच्या लाभापासून वंचित ठेवण्यात आलेले नाही.

(४) व (५) अंशत: खरे आहे.

याबाबत आवश्यक उपाययोजना करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विना अनुदान तथा अंशत: अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अनुदान सूत्र लागू करण्याबाबत

**(३) * ५०६२४ श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.सुनिल शेळके (मावळ), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्ग तुकडयांतील ६५ हजार विना अनुदान तथा अंशत:अनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शासनाच्या दिनांक १५ नोव्हेंबर, २०१५ व दिनांक ०४ जून, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार वेतन अनुदानाचे सूत्र लागू करावे त्याचप्रमाणे ३९६१ शाळांमधील नैसर्गिक

वाढीच्या तुकडयांचा प्रस्ताव निधीसह मंजूर करावा या मागण्यांसाठी शिक्षक समन्वय संघाने दिनांक १० ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्या सुमारास मुंबईतील आझाद मैदान येथे बेमुदत आंदोलन सुरु केले आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागण्यांसंदर्भात शिक्षक समन्वय संघटनेने यापूर्वी दिनांक ०२ ऑक्टोबर, २०१६ व दिनांक २६ ऑगस्ट,२०१९ रोजी देखील वेतनवाढी व अन्य मागण्यांसाठी दोन वेळा आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त शासन निर्णयातील वेतन अनुदानाचे सूत्र लागू करावे अशी मागणी शिक्षक समन्वय संघाने वेळोवेळी शासनाकडे केलेली असून शासनाकडून अद्याप अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचेही माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे
(३) व (४) हे खरे नाही.

विना अनुदान व कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या व अनुदानास पात्र घोषित केलेल्या मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना द्यावयाच्या अनुदान सूत्रामध्ये सुधारणा करुन सरसकट २० टक्के अनुदान देण्याचा निर्णय, मंत्रिमंडळाच्या दि.३० ऑगस्ट, २०१६ रोजीच्या बैठकीमध्ये घेण्यात आला. त्यानुसार दि.१४ जून, २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित केलेल्या शाळा /तुकड्यांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासन निर्णय, दि. १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले.

तसेच, मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० च्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, यापूर्वी २० टक्के वेतन अनुदान सुरु असलेल्या शाळांना नोव्हेंबर, २०२० पासून वाढीव २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आले आहे.
(५) तसेच, दि.१३.१२.२०२२ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत अनुदान मंजूर करण्यात आले असुन त्याकरीता अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

-----------------

## रायगड जिल्हयातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कोलाड-पुई ब्रिटिशकालीन पूल धोकादायक झाल्याबाबत

**(४) * ५०१०६ कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील रायगड जिल्हयातील कोलाड-पुई गावानजीक असलेला म्हैसदरा नदीवरील ब्रिटिश कालीन पूल वाहतूक व प्रवासाच्यादृष्टीने अत्यंत धोकादायक झाला असल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पूलावरुन सतत होणाऱ्या प्रवाशांच्या व अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे कोणत्याही क्षणी पूल कोसळून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त ठिकाणी तात्काळ नवीन पूल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील रायगड जिल्हयातील कोलाड-पुई गावानजीक असलेल्या म्हैसदरा नदीवरील ब्रिटिश कालीन पूलाचे मजबूती करणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे. सदरील पूल वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने धोकादायक नाही. सदरील पुलाचे मजबूतीकरणाचे काम M/s CS Engineering

Services यांच्यामार्फत करण्यात येत असून २ Span चे मजबुतीकरणाचे काम पुर्ण झाले असून तिस-या Span चे काम  प्रगतीपथावर आहे.सदरील पुलाची सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासणी करण्यात आली आहे व सदरील पूल हा सुरक्षित व वाहतुकीस योग्य आहे.
(२) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे सल्लागार M/s CS Engineering Services यांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने पुलाची तपासणी केली आहे व सद्यस्थितीत तेथे वाहतूकीस कुठलाही धोका नसून सदरील पूल हा वाहतुकीसाठी सुरक्षित असल्याचा अहवाल दिलेला आहे.
(३) कि.मी. ४२.३०० ते कि.मी.८४.६०० (कासू ते इंदापूर) या लांबीतील काँक्रिटीकरण (Rigid Pavement) करण्याच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या व हे काम मेसर्स कल्याण टोल इन्फ्रा लिमिटेड यांना मिळाले असून लवादाच्या निर्णयानंतर दिनांक २५ ऑक्टोबर, २०२२ रोजी कंत्राटदारास LOA देण्यात आला आहे व दिनांक १८ नोव्हेंबर २०२२ रोजी appointed date मेसर्स कल्याण टोल इन्फ्रा लिमिटेडला देण्यात आली असून या पूलाच्या बाजूस नवीन २ लेन पूल बांधण्याचे प्रस्तावीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खेडलेझुंगे (ता.लासलगाव, जि.नाशिक) येथील गोदावरी नदीवरील पुलाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(५) * ५२४५८  श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :**  सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेडलेझुंगे (ता.लासलगाव, जि.नाशिक) येथील गोदावरी नदीवरील पुलाची दुरवस्था झाली असून या पुलाला संरक्षण भिंत बांधण्याची मागणी खेडलेझुंगे ग्रामपंचायतीच्यावतीने उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निफाड यांच्याकडे दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२२ व दिनांक १३ ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुलाला संरक्षण कठडा नसल्याने या पुर्वी अनेक वाहन चालकांना आपला जीव गमवावा लागला असून सोमठाणे येथील दोन युवक मोटार सायकलवरुन जातांना पुलावरुन पडून त्यांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रवाशांच्या संरक्षणाच्यादृष्टीने पुलाला कठडा बांधणे व पुलाला पडलेल्या भेगा दुरूस्त करण्याचे काम त्वरीत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :**  (१)  खेडलेझुंगे ग्रामपंचायतीचे निवेदन प्राप्त आहे.
(२)  सदर पुलावर माहे जुलै, २०२२ मध्ये  दुचाकी वाहनाने पाठीमागून धडक दिल्याने मोटार सायकल चालक व सह प्रवासी यांचा तोल गेल्याने अपघात झाल्याची व उपचारा दरम्यान सहप्रवासी यांचा रूग्णालयात मृत्यु झाल्याची नोंद घटनास्थळ पंचनाम्यात आहे.
(३) सदर पुल प्ररामा-२ ते धारणगांव खेडलेझुंगे सोमठाणे रस्ता (प्रजिमा-२५) किमी १४/२०० गोदावरी नदीवरील उच्च पातळीचा बुडीत पुल आहे. सदर पुलास पाईप रेलींग चे संरक्षक कठडे बसविण्यात आलेले आहेत.
सदर पुल बुडीत पुल असल्याने नियमित कार्यपध्दतीनुसार पावसाळ्यात पावसाच्या पुराच्या पाण्यामुळे पुलाला धोका होऊ नये म्हणून  पाईप रेलींग काढून घेण्यात येतात व पावसाळ्यानंतर पुनश्च बसवण्यात येतात.
सुरक्षात्मक उपाययोजना अंतर्गत पुलाच्या दोन्ही बाजूने सावधानतेचे माहिती फलक बसविलेले आहेत तसेच थर्मोप्लॅस्टीक पेंटने दिशादर्शक सुरक्षात्मक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.
(४)  प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पटसंख्येअभावी शाळा बंद न करण्याची महाराष्ट्र राज्य प्राथमिक समितीने केलेली मागणी**

**(६) * ४९५०५  श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले),**

**श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने युडास २०२१-२०२२ नुसार ० ते २० विद्यार्थी पटसंख्या असणाऱ्या शाळा बंद करुन त्या शाळांचे शेजारच्या शाळेत समायोजन करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केल्याचे दिनांक २४ सप्टेंबर,२०२२ रोजी निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे राज्यातील शेकडो शाळा बंद होऊन हजारो शिक्षक अतिरिक्त ठरणार असून सुमारे ३ लाख विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण हक्क कायद्यानुसार चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांना १ ते ४ कि.मी पर्यंत शाळा उपलब्ध करुन देण्याचे शासनाचे धोरण असताना शाळा बंद करण्यात आल्यास ग्रामीण, आदिवासी आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना १० ते १५ कि.मी चे अंतर पार करावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिक्षण हक्क कायदा,२००९ मध्ये नमूद केल्यानुसार सुरु असलेली कोणतीच शाळा बंद करण्याची शिफारस अथवा तरतूद नसल्याने राज्यातील कोणतीही शाळा पटसंख्येच्या नावाखाली बंद करु नये, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक समिती तसेच अन्य शिक्षण संघटनांनी करुन सदर शासन निर्णय रद्द करण्याची मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पटसंख्येअभावी या शाळा बंद न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१), (२), (३) हे खरे नाही.

(४) अंशत: खरे आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### सेंट मेरी इंग्लिश स्कुल मालाड (प.) मुंबई येथील शाळेत शिक्षिकेचा लिफ्ट मध्ये अडकुन झालेला मृत्यु

**(७) * ५००२० श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड पश्चिम, मुंबई येथील चिंचोली बंदर परिसरातील सेंट मेरी इंग्लिश हायस्कूल मधील शिक्षिका जेनेल बोनिफेस फर्नांडिस यांचा शाळेतील लिफ्टमध्ये अडकुन मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अनेक ठिकाणी लिफ्टमध्ये अडकुन अनेकांचे मृत्यू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, कित्येक इमारतींमध्ये नित्कृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन लिफ्ट बसविण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन धोरण ठरविण्यात आले आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

दि.१६.९.२०२२ रोजी मालाड पश्चिम, मुंबई येथील चिंचोली बंदर परिसरातील सेंट मेरी इंग्लिश हायस्कूल मधील शिक्षिका जेनेल बोनिफेस फर्नांडिस यांच्या शाळेतील लिफ्टमध्ये अडकून मृत्यू झाला आहे.

(२) मागील एक वर्षामध्ये मुंबई व परिसरात उद्ववाहनांमध्ये एकूण चार प्राणांतिक अपघात घडलेले आहेत.

(३) हे खरे नाही.

उद्ववाहनाची नियतकालीन देखभाल दुरुस्ती योग्यरित्या न राखल्यामुळे अशाप्रकारचे अपघात झालेले आहेत.

(४) सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्यामध्ये, महाराष्ट्र उदवाहन कायदा १९३९ व महाराष्ट्र उद्ववाहन नियम १९५८ लागू आहे. त्यानुसार उदवाहनांची नियमित वार्षिक तपासणी करण्यात येते. सदर तपासणीत उद्ववाहनाच्या काही चाचण्या घेण्यात येतात. सदर चाचणीत काही दोष आढळल्यास ते दूर करण्यासाठी त्रुटी पत्र देण्यात येते व पाठपुरावा करुन सदर त्रुटी दूर करुन घेण्यात येतात. तसेच सदर उदवाहन मान्यता प्राप्त उदवाहन ठेकेदारामार्फत देखभाल व दुरुस्तीच्या कराराच्या माध्यमातून सुस्थितीत ठेवले जाते किंवा कसे याकडेही लक्ष पुरविले जाते. तसा करार नसल्यास देखभाल दुरुस्तीचा करार करण्याबद्दल उदवाहन मालकांना उदवाहनांच्या सुरक्षित राहण्याकरीता लेखी सूचना देण्यात येतात.

सद्यस्थितीत महाराष्ट्र उदवाहन, सरकते जिने, सरकते मार्ग कायदा, २०१७ अधिसूचित झालेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### नागपूर-औरंगाबाद रस्त्याच्या दुरूस्तीच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(८) * ४९७६७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-औरंगाबाद या ५१३ .५ किलोमीटर लांबीच्या राष्ट्रीय महामार्गाच्या ८४.१५ कोटी रुपयाच्या दुरुस्तीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करुन गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑक्टोंबर २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यावर दुरुस्तीनंतर पहिल्याच पावसाळयात मोठ्या प्रमाणात पडलेल्या खड्डयांमुळे अपघाताच्या संख्येत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याकरिता व संबंधित दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सदर रस्त्याचे पूर्ण झालेले दुरुस्तीचे काम हे कंत्राटदाराच्या दोषदायित्व कालावधीमध्ये असून आवश्यक त्या ठिकाणी त्यांचेकडून सुधारणा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शेवगाव (अहमदनगर) येथील सनफ्रेश ॲग्रो इंडस्ट्रीजमध्ये दुधात भेसळ होत असल्याबाबत**

**(९) * ४९७३८ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेवगाव (जि.अहमदनगर) येथील सनफ्रेश ॲग्रो इंडस्ट्रीजमध्ये विक्री होत असलेल्या दुधामध्ये भेसळ आढळल्यामुळे अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी १००० लिटर दूध नष्ट केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सनफ्रेश ॲग्रो इंडस्ट्रीजवर अन्न व औषध प्रशासन विभागाने या अगोदरही दुध भेसळ प्रकरणी कारवाई केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे अंशत: खरे आहे.

अन्न व औषध प्रशासन, अहमदनगर कार्यालयातील अधिका-यांनी दिनांक १०/१०/२०२२ रोजी मे. सनफ्रेश ॲग्रो इंडस्ट्रिजचे दुध संकलन व शीतकरण केंद्र, शेवगाव या पेढीची तपासणी केली असता सदर पेढीकडे विक्रीसाठी आणलेल्या मे. विवेकानंद दुध संकलन केंद्र, वीर सावरकर मैदान, पाथर्डी, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर या पेढीकडील गाईच्या दूधाची सुक्रोजची चाचणी पॉझिटिव्ह आल्याने सदर साठयातून गाईच्या दूधाचा अन्न नमुना विश्लेषणासाठी घेण्यात आला. सदर दुधाची साठवणुक व वाहतुक खराब व आतुन किटन आलेल्या प्लास्टीक कॅन्समधून केल्याने उर्वरित ९४८ लिटर रु. ३३,१८०/- किंमतीचा साठा नष्ट करण्यात आला. तसेच दिनांक १०/१०/२०२२ रोजी मे. सनफ्रेश ॲग्रो इंडस्ट्रिजचे दुध संकलन व शीतकरण केद्र,शेवगाव येथे संकलित केलेल्या गाय दूधाच्या साठयातून ०१ नमुना विश्लेषणासाठी घेण्यात आला.

(२) होय, हे खरे आहे.

दिनांक ०६/०६/२०२२ रोजी मे सनफ्रेश ॲग्रो इंडस्ट्रिजचे दुध संकलन व शीतकरण केंद्र, ग्रा.मि.नं.५०६, हंडीनिमगाव, ता.नेवासा, जि. अहमदनगर या आस्थापनेची तपासणी करुन गाय दुधाचा नमुना विश्लेषणासाठी घेवून राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे पाठविण्यात आला. सदर नमुन्याच्या विश्लेषण अहवालात Skimmed Milk Powder - Positive, Detergent - Positive व Potassium २०६.६ mg/१०० gm हे मानकापेक्षा जास्त आढळून आल्याने तो असुरक्षित घोषित करण्यात आला आहे. संबधित आस्थापनेच्या अपीलनुसार सदर नमुना फेरविश्लेषणासाठी रेफरल अन्न प्रयोगशाळा, म्हैसूर येथे पाठविण्यात आला असून त्याचा अहवाल प्रलंबित आहे.

(३) उपरोक्त दोन्ही प्रकरणातील नमुन्यांचे फेरविश्लेषण अहवाल प्रलंबित असून विश्लेषण अहवाल प्राप्त होताच विश्लेषण अहवालाचे अनुषंगे पुढील कारवाई घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत बाटलीबंद पाण्याच्या शुध्दीकरणासाठी नियमावली तयार करण्याबाबत

**(१०) * ४९७७८ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व पुणे येथे बंद बाटलीसह जारमधील पाण्याचा व्यवसाय मोठया प्रमाणात सुरु असून जार/बाटलीचे पाणी शुध्द आहे किंवा कसे हे तपासण्याची नियमावलीच अस्तित्वात नसल्याने आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड शहरात महापालिकेचे येणारे पाणी व बोअरवेल मधून पाण्याचा उपसा करुन थंड करुन ते पाणी जारमध्ये भरुन समारंभ, सण, लग्न, पाटर्या व कार्यालयात विक्री करण्याचा व्यवसाय सुरु असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ड्रिंक्रिग वॉटर या व्याख्येमध्ये जारचे पाणी बसत नसल्याने आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक असलेल्या जारच्या पाण्याची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यास अन्न व औषध प्रशासन विभागाला मर्यादा आहेत तसेच पारदर्शक बाटलीबंद पाण्याच्या व्यवसायासाठी शासनाची परवानगी घेणे आवश्यक आहे मात्र रंगीत जार मधील पाण्याची तपासणीसाठी कोणतीही व्यवस्था नसल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईसह राज्यात विकल्या जाणाऱ्या बाटलीबंद तसेच मोठया जारमधील पाण्याची शुध्दता तपासण्याकरीता नियमावली तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व त्याअंतर्गत नियम व नियमने २०११ नुसार पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरसाठी अन्न सुरक्षा व मानके( फूड प्रॉडक्टस ॲन्ड फूड ॲडिटिव्ह ) नियमन २०११ मधील नियमन २.१०.८ अन्वये मानके निश्चित करण्यात आलेली आहेत. सदर व्यवसायासाठी अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत परवाना घेणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगे या प्रशासनाकडून पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरचे अन्न नमुने विश्लेषणासाठी नियमितपणे घेतले जातात.

मोठे जार/रंगीत जार /कॅन मधून थंड पाणी विक्री करणारे युनिटस/उत्पादक/ विक्रेते यांचे संदर्भात दाखल ओरीजन ॲप्लीकेशन नं.७५/२०१७ विजयसिंह दुबल व इतर विरुध्द MPCB व इतर मध्ये National Green Tribunal (राष्ट्रीय हरीत अधिकरण ), नवी दिल्ली यांनी दि. १९.१०.२०२० रोजी दिलेल्या आदेशात “ The point no (c ) mentioned in the point no. २३४ on page १५३ मध्ये पाण्याची शुध्दता तपासण्याबाबत नियमावली तयार करणे, मानके निश्चित करणे ही नमूद बाब अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण,नवी दिल्ली यांचे कक्षेत येत असल्याने त्याबाबत अन्न व औषध प्रशासनाकडून सदर प्राधिकरणास अवगत करण्यात आले आहे.

(४) अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ व त्या अंतर्गत नियम व नियमने २०११ नुसार पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरसाठी अन्न सुरक्षा व मानके ( फूड प्रॉडक्टस ॲन्ड फूड ॲडिटिव्ह ) नियमन २०११ मधील नियमन २.१०.८ अन्वये मानके निश्चित करण्यात आलेली असून या प्रशासनाकडून पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येतात.

मोठे जार/रंगीत जार /कॅन मधून थंड पाणी विक्री करणारे युनिटस/उत्पादक/ विक्रेते यांचे संदर्भात दाखल ओरीजन ॲप्लीकेशन नं.७५/२०१७ विजयसिंह दुबल व इतर विरुध्द MPCB व इतर मध्ये National Green Tribunal (राष्ट्रीय हरीत अधिकरण ), नवी दिल्ली यांनी दि. १९.१०.२०२० रोजी दिलेल्या आदेशात “ The point no (c ) mentioned in the point no. २३४ on page १५३ मध्ये पाण्याची शुध्दता तपासण्याबाबत नियमावली तयार करणे, मानके निश्चित करणे ही नमूद बाब अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण,नवी दिल्ली यांचे कक्षेत येत असल्याने त्याबाबत अन्न व औषध प्रशासनाकडून सदर प्राधिकरणास अवगत करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शिक्षकांच्या रिक्त झालेल्या पदांबाबत

**(११) * ५००८८ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.राजन साळवी (राजापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळांमध्ये शिक्षकांची दहा टक्क्यांपेक्षा अधिक पदे रिक्त असू नयेत असा नियम असतानाही राज्यातील शासकीय शाळांमध्ये प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षकांची सुमारे ६७ हजार पदे रिक्त असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक ३० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक असणे आवश्यक असताना रिक्त पदांमुळे शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक शिक्षकांकडे अशैक्षणिक कामे देण्यात आल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागील दहा वर्षापासून डी.एड व बी.एड शिक्षकांची भरती झाली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शिक्षक भरती प्रक्रियेसाठी तयार केलेले पवित्र पोर्टलदेखील सद्य:स्थितीत बंद असल्यामुळे त्याचा परिणाम भरती प्रक्रियेवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

उपलब्ध शिक्षकांमधून आवश्यक अध्यापनाचे काम करुन घेण्यात येत आहे, तसेच आवश्यकतेनुसार तासिका तत्वावर शिक्षकांची सेवा घेण्यात येत आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

(६) सन २०१७ मध्ये शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीद्वारे निवड झालेले उमेदवार पवित्र प्रणालीमार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच शिक्षक पात्रता परीक्षेमध्ये उत्तीर्ण उमेदवारांची शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी फेब्रुवारी २०२३ मध्ये आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्याचे नियोजित आहे.

तसेच  राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्यास परवानगी मिळण्याबाबत वित्त विभागाची मान्यता घेण्याची कार्यवाही सरु आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनेक मोठे प्रकल्प राज्याबाहेर गेल्याबाबत

**(१२) * ४९५१४ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.संजय बनसोडे (उदगीर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वेदांत फॉक्सकॉन, टाटा एअर बस सी-२९५, बल्क ड्रग पार्क, वैद्यकीय उपकरणे निर्मिती पार्क, सॅफ्रॉन हे प्रकल्प राज्याबाहेर गेल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मोठे प्रकल्प परराज्यात गेल्याने राज्याचे १ लाख ८० हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात कौशल्य असलेले मनुष्यबळ उपलब्ध असताना प्रकल्प राज्याबाहेर गेल्याने सुशिक्षित बेरोजगार व सर्वसमान्यांमध्ये असुरक्षिततेचे व असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सरकारने हे प्रकल्प व गुंतवणुक आपल्या राज्यात येण्यासाठी केलेले प्रयत्न, प्रयत्नात झालेली कसूर, जबाबदारी निश्चिती तसेच प्रकल्प राज्याबाहेर जाण्यापासून रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

अ) वेदांता, फॉक्सकॉन,टाटा एअरबस सी २९५ या कंपन्यांपैकी कोणत्याही कंपनीने शासनासोबत सामंजस्य करार केलेला नाही.

ब) सॅफ्रन या फ्रेंच बहुराष्ट्रीय कंपनीने त्याच्या नियोजित प्रकल्पाबाबत गुंतवणुकीसाठी अथवा जागेची मागणी करणारा कोणताही अर्ज महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे दाखल केलेला नाही, तसेच सदर कंपनीने सॅफ्रान प्रकल्पाबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी कोणतेही चर्चा अथवा पत्रव्यवहार केलेला नाही.

क) बल्क ड्रग पार्क व वैद्यकीय उपकरणे निर्मिती पार्क याबाबत केंद्र सरकारच्या अनुदान योजनेअंतर्गत महाराष्ट्राने प्रस्ताव दाखल केलेले आहेत. रायगड जिल्हयामध्ये बल्क ड्रग पार्क स्थापन करण्याकरीता रु.१००० कोटी अनुदान मिळणेबाबतचा प्रस्ताव दि.१४.०८.२०२० व दि.०७.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे. त्यासंदर्भात केंद्र शासनाने दि. ०९.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार बल्क ड्रग्स पार्क स्थापन करण्याबाबतच्या अतिरिक्त त्रुटींची माहिती दि.०७.०१.२०२२ रोजीच्या अ.शा.पत्रान्वये केंद्र शासनास कळविण्यात आले आहे. सदर प्रस्तावास केंद्र शासनाची मंजुरी प्रलंबित आहे.

ड) केंद्र शासनाच्या दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर (डीएमआयसी) प्रकल्पातंर्गत महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद येथील शेंद्रा बिडकीन येथे ऑरिक हे औद्योगिक शहर वसविण्यात येत आहे. सदर शहरामध्ये मेडिकल डिव्हाईस पार्क स्थापन करण्याचा राज्य शासनाचा मानस असून, सुमारे ३५० एकर क्षेत्रामध्ये सुमारे ४५० कोटी रुपये एवढया अंदाजित खर्चाचे सदर मेडिकल डिव्हाईस पार्क स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या औषध विभाग, रसायन व खते मंत्रालयाकडे दि.१४.१०.२०२० रोजीच्या शासन पत्रान्वये सादर केलेला आहे. सदर प्रस्तावास केंद्र शासनाची मंजुरी प्रलंबित आहे.

(२) व (३) प्रश्न उद्धवत नाही

(४) दि.५ जानेवारी,२०२२ रोजी वेदांता-फॉक्सकॉन उद्योग घटकाने राज्यात गुंतवणूक करण्याबाबतचा मानस व्यक्त केला. त्यानुषंगाने दि.११ जानेवारी,२०२२ रोजी राज्य शासनाने सदर प्रकल्पासाठी सर्वोतोपरी सहाय्य करण्याचे तत्वत: मान्य केले. दि.१४ व १५ जुलै,२०२२ रोजी मा. मुख्यमंत्री तसेच मा. उप मुख्यमंत्री महोदयांच्या पत्राव्दारे वेदांता उद्योग समुहास राज्य शासनासोबत सामंजस्य करार करण्याबाबत कळविण्यात आले. दि.१५ जुलै,२०२२ रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय समितीची (High Powered Committee) बैठक घेण्यात येऊन, सदर बैठकीत सुमारे ३८,०००/- कोटी इतक्या मूल्याची भांडवली प्रोत्साहने, जमीन,वीज, पाणी इ. सवलती व इतर प्रोत्साहने वेदांताच्या नियोजित प्रकल्पास देवू करण्यात आली.तथापि, या घटकाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अथवा राज्य शासनाशी कोणताही सामंजस्य करार केला नाही.

(५) प्रश्न उद्धवत नाही.

-----------------

**मुंबई-अहमदाबाद महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना अदा करण्याबाबत**

**(१३) * ५१८४७ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.योगेश सागर (चारकोप), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी भूसंपादन केलेल्या हालोली आणि सातीवली (ता.जि.पालघर) गावचे निवाडे जाहिर होऊन दीड वर्षांचा कालावधी होऊनही या प्रकल्पबाधित शेतक-यांना त्यांच्या संपादित जमिनीचा मोबदला अद्याप मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या शेतक-यांनी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महामार्गालगत सुरु असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे काम रोखून माहे सप्टेंबर, २०२२ च्या दुस-या पंधरवडयात केलेल्या आंदोलनानंतर तातडीने नवीन भूसंपादन प्रक्रिया राबवून शेतक-यांना मोबदला देण्याचे आदेश जिल्हाधिकारी, पालघर यांनी देऊनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांना संपादित जमिनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१), (२), (३) व (४) मुंबई-अहमदाबाद या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

हालोली गावचा सर्वे. नं. ३५९,४३५,२२७,३४६ व ३४७ आणि सातीवली गावचा सर्वे.४२/१ या संपादनातील मिसिंग प्लॉट वगळता इतर भूधारकांना मोबदला अदा करणेत आला आहे. वरील सर्वे नंबरचा निवाडा मंजूर होणेसाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सुरत यांनी क्षेत्रीय अधिकारी, गांधीनगर यांच्याकडे पाठवला होता. परंतु प्रकल्पासाठी मंजूर असलेल्या रक्कमेपेक्षा ही रक्कम जास्त असल्यामुळे प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव MoRTH कडे पाठविण्यात आला होता. त्याची मंजूरी प्राप्त झाली आहे. आता क्षेत्रीय अधिकारी मुंबई कडून वरील निवाडयाच्या रक्कमेस मंजूरी मिळाल्यावर सदर मोबदल्याची रक्कम सक्षम प्राधिकारी डहाणू यांच्याकडे जमा करुन मोबदला देण्याचे नियोजन आहे.

-----------------

## सोलापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थी गणवेशापासून वंचित असल्याबाबत

**(१४) * ५४१५७ श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सुमारे २ लाख विद्यार्थी गणवेशापासून वंचित राहिले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गणवेश अनुदान शाळेच्या नावाने न देता शासनाने पीएफएमएस प्रणालीद्वारे प्रत्येक शाळेच्या नावावर महाराष्ट्र बँकेला रक्कमेचे लिमिटेशन मंजूरी दिल्यावरच बँकेनी थेट गणवेश पुरवठादारास रक्कम पाठविण्याची पद्धती अवलंबली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत शासनाने लिमिटेशनला मंजुरीच दिली नसल्यामुळे तसेच शाळा सुरू होऊन ४ महिने झाले तरीही विद्यार्थ्यांना गणवेश मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) अंशत : खरे आहे.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेश योजनेसाठी सन २०२२-२३ या वर्षाकरीता सोलापूर जिल्ह्यात एकूण १,४८,४०५ पात्र लाभार्थी असून त्यापैकी १,४०,१०१ इतक्या लाभार्थ्यांना दि.१३ डिसेंबर, २०२२ अखेर गणवेश उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

गणवेश अनुदान PFMS प्रणालीव्दारे शाळा व्यवस्थापन समितीकडून संबंधित गणवेश पुरवठादारास अदा करण्यात येते.

(३) अंशत: खरे आहे.

(४) व (५) प्रस्तुत योजनेशी संबंधित HDFC बँकेतील तांत्रिक अडचणी दूर होण्यापूर्वी उर्वरित ८,३०४ लाभार्थ्यांना शाळा व्यवस्थापन समितीने स्वत:च्या क्रेडीटवर गणवेश उपलब्ध करुन देण्यात यावेत, अशा सूचना जिल्हास्तरावरुन देण्यात आल्या आहेत.

-----------------

## कळंबोली येथील भारतीय खाद्य निगमच्या गोदामाला लागलेल्या आगीबाबत

**(१५) * ५०६४२ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भारतीय खाद्य निगमच्या पनवेल (नवी मुंबई) कळंबोली येथील ५-बी गोदामाला दिनांक २६ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास आग लागून रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानांमध्ये पुरविण्यासाठी ठेवलेला तांदूळ मोठया प्रमाणात जळून खाक झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार या गोदामात तांदळाच्या प्रत्येकी ५० किलोच्या २३ हजार ६८६ गोण्या ठेवण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही तांदुळाच्या गोण्या आगीत जळाल्या असून आग विझवताना पाण्याचा मारा केल्यामुळे उर्वरीत तांदूळ देखील भिजळयामुळे खराब झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) व (२) हे खरे आहे.

तथापि प्रश्नाचा विषय भारतीय खाद्य निगम यांचेशी संबंधित आहे. भारतीय खाद्य निगम हे राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली येत नसून, ते केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते. प्रश्नाधीन बाब राज्य शासनाशी संबंधित नाही.

(३) भारतीय खाद्य निगम यांचे अहवालानुसार आग आटोक्यात आणण्याकरिता अग्निशमन दलाच्या जवानांना उच्च दाबाने पाण्याचा वापर करावा लागला. तसेच अन्नधान्य नुकसानीचे प्राथमिक कारण पाणी नसून आग हे होते. तथापि थप्पीमधील गोण्यांचे पूर्णपणे नुकसान झालेले नाही. बऱ्याचशा चांगल्या स्थितीतील गोण्या बाहेर काढण्यात आलेल्या आहेत.

(४) भारतीय खाद्य निगम यांचे मुख्य कार्यालयामार्फत सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून प्राप्त अहवालानुसार आगीचे कारण शॉर्ट सर्किट असल्याचे नमूद केले आहे.

अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी भारतीय खाद्य निगम यांचेमार्फत घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पाथरी-परभणी (ता.मानवत, जि.परभणी) राष्ट्रीय महामार्गावरील देवलगाव अवचार रस्त्याच्या कामाबाबत**

**(१६) * ५०१६९ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी-परभणी (ता.मानवत, जि.परभणी) राष्ट्रीय महामार्गावरील देवलगाव अवचार रस्त्याचे काम करणाऱ्या कंत्राटदाराने गत तीन वर्षापासून रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत ठेवले असून जे काम केले आहे तेही निकृष्ट दर्जाचे झाल्याने अनेक जागी खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे अपूर्ण काम तात्काळ पूर्ण करावे, पुलाची उंची वाढवावी तसेच रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करण्याची मागणी विविध संघटनांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांच्याकडे वारंवार लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करुन त्यास जबाबदार असलेल्या संबंधित कंत्राटदारावर कारवाई करुन अपूर्ण असलेले काम तातडीने पुर्ण करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) सदर रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली असून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत करण्यात आला आहे.

(२) होय, निवेदन प्राप्त आहे.

(३) सदरचा रस्ता प्रजिमा दर्जाचा असून १० कि.मी. लांबीमध्ये मंजूर कामाच्या भौतिक प्रगतीवर कोविड च्या प्रादुर्भावामुळे अंशत: परिणाम झाला. ना-दुरुस्त झालेले काम संबंधित कंत्राटदाराकडून दुरुस्ती करुन घेण्यात आले असून रस्ता वाहतूकीस सुस्थितीत करण्यात आला आहे. सदरचे काम डिसेंबर, २०२२ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

सदर रस्त्यावर मंजूर नळकांडी पुलाची उंची वाढविण्यात आली असून उर्वरित काम जानेवारी, २०२३ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

सदरची कामे करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे.मुस्ती (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) येथील हरणा नदीवर पूल बांधण्याबाबत

**(१७) * ५०५५४ श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मुस्ती (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) येथील हरणा नदीवर पुलाचे बांधकाम करण्यात आले नसल्यामुळे दोन तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचे दिनांक २० जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील नदीपात्रावर पूल बांधण्याबाबत ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, सोलापूर तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर यांचेकडे निवेदने सादर करुनही जिल्हा प्रशासनाने कार्यवाही न केल्यामुळे ग्रामस्थांनी दिनांक १९ जुलै, २०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर तसेच शासकीय रुग्णालय येथे ठिय्या आंदोलन करुन त्वरीत पूल बांधण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदर पूल बांधकामासंदर्भात दोन दिवसात शासनास प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांना आदेशित केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय. हे खरे आहे.

सदर रस्ता इजिमा ८६ दर्जाचा असून या ठिकाणी पूल नसल्याने नदीपात्र ओलांडत असताना एक तरूण नदीमध्ये वाहून गेला आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) हे खरे आहे. त्यानुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अहवाल सादर केला आहे.

(४) व (५) सदर रस्ता इजिमा ८६ दर्जाचा असून, सदर रस्त्यावर नाबार्ड अंतर्गत पुलाचे बांधकाम करण्याचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

-----------------

## बीड जिल्हा परिषदे अंतर्गत माध्यमिक शाळांकरिता प्रयोगशाळा उभारणी (ICT LAB) व साहित्य खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(१८) * ५२४४२ श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा परिषदअंतर्गत सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षाकरिता माध्यमिक शाळांकरिता प्रयोगशाळा उभारणी (ICT LAB) व साहित्य खरेदी करणेसाठी समग्र शिक्षाअंतर्गत सुमारे २ कोटी १० लाख ८० हजार रुपये इतके अनुदान शासनाने मंजूर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद,बीड यांनी काही तांत्रिक अडचणींमुळे एक वर्षानंतर सदरील कामाची निविदा प्रसिध्द करुन दिनांक २ मार्च, २०२२ रोजी वा त्या सुमारास कार्यारंभ आदेश (Work Order) मेसर्स ओमेगा सिस्टीम, नाशिक यांना दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून प्राप्त अनुदान देण्यासाठी ३४ शाळांची झालेली निवड व गुणवत्तेनुसार अनुदानाचे वितरण करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, UDISE २५ टक्के प्रवेश याबाबत समग्र शिक्षा अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांविरुध्द चौकशी सुरु असतांना त्या कर्मचाऱ्यांकडे ICT लॅबची संचिका देण्यात येवून मोठा आर्थिक गैरव्यवहार करण्यात आला असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने त्रयस्थ समितीमार्फत चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ नोव्हेंबर,२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा,मुख्यमंत्री, आयुक्त,औरंगाबाद तसेच राज्य प्रकल्प संचालक (प्राथमिक शिक्षण) यांचेकडे केली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कंपनी व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) होय.
(६) मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालाची तपासणी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई कार्यालयामार्फत सुरू आहे.
(७) लागू नाही.

-----------------

**भिवंडी-वाडा (ता.भिवंडी,जि.ठाणे) या रस्त्याचे निकृष्ट काम करणाऱ्या कंपनीवर कारवाई करण्याबाबत**

**(१९) * ५११८९ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी-वाडा (ता.भिवंडी,जि.ठाणे) रस्त्यावरील नदी नाका येथील पुलाचे काम गत ४ वर्षापासून प्रलंबित असून मे.मयुर कन्स्ट्रक्शन यांनी सदर काम करीत असताना निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन पुलाचे काम निकृष्ट झाले असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदन देऊन सबंधित कंपनीवर कारवाई करून सदर कंपनीस काळया यादीत समाविष्ट करण्याची मागणी माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच रस्त्यावरील कामोटी नदीवर नदी नाका येथे नवीन पूल बांधणे, वडपे- भिणार- निंबवली रा.मा. क्र. ८४ वरील वडपे जंक्शनचे काँक्रिटीकरण करणे, भिवंडी पारोळ रस्त्यावर लहान पुलाचे बांधकाम करणे व तुळशी करंजोटी ड्रामा १३६ कुबेरी नदीवर लहान पूलाचे बांधकाम करणे इत्यादी कामे देखील निकृष्ट दर्जाची झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, कोकण भवन यांनी सदर निकृष्ट दर्जाच्या कामांची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय, मा. लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त आहे.
(२), (३) व (४) प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, कोकण यांच्याकडून चौकशी अहवाल मागविण्यात आला आहे. अहवालातील निष्कर्षानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(५ ) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे कात्रज-आंबेगाव बुद्रुक तसेच नांदेड येथे गोदामावर टाकलेल्या धाडीत भेसळयुक्त तूप, वनस्पती तूप व गुळ जप्त केल्याबाबत**

**(२०) * ४९६७१ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी),**

**श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पुणे, कात्रज-आंबेगाव बुद्रुक येथे गोदामावर टाकलेल्या धाडीत भेसळयुक्त ८८ किलो तूप आणि वनस्पती तूप जप्त केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईतील दहिसर, कुर्ला, गोवंडी, भायखळा आणि घाटकोपरसह विविध भागात धाडी टाकून १ कोटी ४ लाख १४ हजार रुपयांचे भेसळयुक्त खाद्यतेलही जप्त केले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच नांदेड शहरात मुंबईहून टेम्पोद्वारे भेसळयुक्त पनीर, खाद्यपदार्थ येत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आणुनही अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच दौंड (जि.पुणे) तालुक्यातील अनेक गु-हाळाच्या ठिकाणी साखर, मुदतबाहय चॉकलेट्स, कोको पावडर व भेसळयुक्त गुळाचे उत्पादन घेतले जात असल्याचे दिनांक ०८ ऑगस्ट,२०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यानुसार भेसळयुक्त खाद्यपदार्थ तयार करणाऱ्यांवर तसेच विक्री करणाऱ्यांविरुध्द आणि पुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) होय. अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ०९/०८/२०२२ रोजी पुणे,कात्रज-आंबेगाव येथील गोदामातून भेसळयुक्त तूप व वनस्पती तूप जप्त केले आहे.

(२) अन्न व औषध प्रशासन, बृहन्मुंबई विभाग यांनी दहिसर, कुर्ला, गोवंडी, भायखळा आणि घाटकोपर या भागात धाडी टाकून भेसळीच्या संशयावरुन उर्वरीत १ कोटी ९ लाख १९ हजार ११७ रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

तथापि, नांदेड कार्यालयामार्फत माहे एप्रिल २०२२ ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत पनीर या अन्नपदार्थाचे एकुण ५ नमुने घेण्यात आले असून एकुण २७० कि.ग्रॅ. रुपये ७६,२६० किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. सदर नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत.

(४) दौंड तालक्यातील (जि.पुणे) येथे धाडी घालून गुळाचे उत्पादन होत असतांना विश्लेषणासाठी नमुने घेतले व भेसळ करण्यासाठी अपमिश्रक म्हणून वापरण्यात आलेल्या साखर या अन्नपदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे.

(५) अन्न नमुने असुरक्षित, मिथ्याछाप व कमी दर्जाचे आढळून आलेल्या प्रकरणांमध्ये संबंधितांविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायदयांतर्गत पुढील कारवाई घेण्यात येत आहे.

सदर घटना जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड व अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे या कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात घडलेली नसल्याने पुरवठा विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-पुणे व मुंबई-अहमदाबाद महामार्गाचे सुरक्षा परिक्षण (Security Audit) करुन अपघातास कारणीभुत असणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(२१)** * **४९४४९ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी),**

**श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवसंग्राम संघटनेचे नेते श्री. विनायक मेटे यांचे मुंबई-पुणे महामार्गावर झालेल्या अपघातात निधन झाल्याचे तसेच मुंबई-अहमदाबाद महामार्गावर चारोटीजवळील सुर्या नदीच्या पुलावरील वळणावर टाटा सन्सचे माजी अध्यक्ष श्री.सायरस मिस्त्री यांच्या गाडीला भिषण अपघात होऊन त्यांचा मृत्यू झाल्यामुळे सदर दुर्घटनेच्या सखोल चौकशीचे आदेश मा.उपमुख्यमंत्री यांनी राज्याच्या पोलीस महासंचालकांना दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामार्गांचे सुरक्षा लेखापरिक्षण (Security Audit) करण्याची मागणी पालघर येथील नागरीक व लोकप्रतिनिधींनी दि.६.९.२०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील मुंबई ते अहमदाबाद या राष्ट्रीय महामार्गावर २८ अपघात प्रवण क्षेत्रे असून गत सात महिन्यांमध्ये १७७ पेक्षा अधिक अपघात होऊन यामध्ये ६२ जणांचा अपघाती मृत्यु तर १९२ जण गंभीर जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महामार्गाची रचना, खड्डे, धोकादायक वळणे, सेवा रस्त्यांचा अभाव, रस्त्यात बंद पडलेली वाहने हटविण्याकरीता नसलेली यंत्रणा, कंत्राटदाराचा बेजाबदारपणा, निकृष्ट बांधकामे,दर्शक फलक नसणे,पथ दिवे बंद असणे तसेच रस्त्यावरील अतिक्रमणे इत्यादी कारणांमुळे महामार्ग धोकादायक होऊन अपघातांच्या संख्येत वाढ होत असल्याने या सर्व रस्त्यांचे सुरक्षा लेखापरिक्षण (Security Audit) करुन अपघात रोखण्यासाठी तसेच यासंदर्भात जबाबदारी निश्चिती व अपघात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदरचे मागणी पत्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नस्तीवर आढळून येत नाही.

(३) हे खरे नाही.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ हा आच्छाड ते दहिसर चेक नाका असा असून एकूण ११८ कि.मी. ठाणे व पालघर जिल्हयात आहे. सदर हद्दीमध्ये चिंचोटी, मनोर व चारोटी असे तीन महामार्ग पोलीस मदत केंद्र आहेत. रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय यांचे जा.क्र.डी.ओ.क्र.एमआर-१७०१८/१/२०१८-टिआरडब्लु (आरटी), दिनांक २९.०३.२०२२ अन्वये महाराष्ट्र राज्यातील महामार्ग, राज्य महामार्ग जिल्हा मुख्य रस्ते व इतर रस्त्यांवरील सन २०१९-२०२१ मधील अपघातांचे आकडेवारी नुसार ब्लॅक स्पॉटची यादी प्रसिध्द केली असून यादीनुसार पालघर जिल्हयातील मुंबई-अहमदाबाद महामार्ग क्रमांक ४८ वर एकूण ११ ब्लॅक स्पॅाट आहेत. गत ७ महिन्यांमध्ये (माहे एप्रिल ते ऑक्टोबर-२०२२) एकूण २७१ अपघात झाले असून त्यामध्ये १०९ लोकांचा मृत्यु झाला आहे. केंद्रिय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय (MoRTH) च्या २०१४ पर्यंतच्या अहवालानुसार या रस्त्यावर ५ अपघातग्रस्त स्थळे आहेत असे कळविण्यात आले होते व त्या ठिकाणी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडून सुरक्षेबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आली आहे.

(४) महामार्ग पोलीसांमार्फत मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ ची ११८ कि.मी. हद्द असून चिंचोटी, मनोर व चारोटी या तीन महामार्ग पोलीस केंद्रामार्फत वाहतुक नियोजनाचे कामकाज करण्यात येत असून महामार्गावर नियमित पेट्रोलिंग करुन अपघात ठिकाणी तात्काळ पोहचून अपघातग्रस्तांना मदत, कसुरदार वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई व इतर कामकाज करण्यात येते. महामार्गावर बंद पडलेली वाहने, अपघातग्रस्त झालेली वाहने यांना राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडील MS व्दारे क्रेनच्या मदतीने तसेच गरज भासल्यास खाजगी क्रेनच्या मदतीने महामार्गावरुन बाजूला करुन वाहतुक सुरळीत करण्यात येते. तसेच, निकृष्ट बांधकामे दर्शक फलक नसणे, पथदिवे बंद असणे तसेच रस्त्यावरील अतिक्रमणे याबाबत महामार्ग पोलीस केंद्रामार्फत संबंधीत विभागाशी वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात येतो.

तसेच, केंद्रिय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय (MoRTH) च्या २०१४ पर्यंतच्या अहवालानुसार या रस्त्यावर २२ अपघातग्रस्त स्थळे आहेत असे कळविण्यात आले होते व त्या ठिकाणी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडून सुरक्षेबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगरातील शाळांमध्ये स्वच्छतागृहांची झालेली दुरवस्था

**(२२) * ४९९८८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील २३५ शासकीय अनुदानित शाळांपैकी २०७ शाळांमध्ये स्वच्छतागृहांची दुरवस्था झाल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुला-मुलींच्या प्रमाणानुसार शाळांमध्ये स्वच्छतागृह उपलब्ध करण्याबाबत स्वतंत्र धोरण आखले जात नसल्याने मुंबई उच्च न्यायालयाने याबाबत शासनाला कारणीभूत ठरविले असून खेद व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अस्वच्छ शौचालये तसेच सॅनिटरी नॅपकिन्स उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थिनी शाळेत जात नाहीत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ८० टक्के शाळांमध्ये डस्टबिन आणि सॅनिटरी नॅपकिनच्या विल्हेवाटीसाठी मूलभूत सुविधा देखील नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील शहरी भागातील तसेच ग्रामीण भागातील शासन अनुदानित शाळांना सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१),(२),(३) व (४) हे खरे नाही.

(५) अनुदानित शाळांना स्वच्छतागृहांची स्वच्छता व दुरुस्ती तसेच सर्वसाधारण स्वच्छतेसाठी वेतनेतर अनुदानातून खर्च करता येईल अशी तरतूद आहे.

(६ ) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्हयात धान खरेदी केंद्र सुरु करण्याची मंजूरी देऊनही अनेक केंद्र बंद असल्याबाबत

**(२३) * ५२५९२ श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयात जिल्हा प्रशासनाने जिल्हा मार्केटींग फेडरेशन तसेच आदिवासी विकास महामंडळ यांच्या वतीने संचालित १०० धान खरेदी केंद्रांना दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मंजूरी नंतरही अनेक केंद्र बंद असल्याने शेतकऱ्यांना धान विक्रीसाठी वाट बघावी लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन मंजूरी दिलेले धान खरेदी केंद्र तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

जिल्हा समन्वय समितीने दिलेल्या मान्यतेनुसार गोंदिया जिल्ह्यात पणन हंगाम २०२२-२३ मध्ये धान खरेदीकरीता मार्केटिंग फेडरेशनमार्फत दि.०१.११.२०२२ पर्यंत ११५ आणि आदिवासी विकास महामंडळामार्फत दि.१८.११.२०२२ पर्यंत २६ अशा एकूण १४१ धान खरेदी केंद्रांना मंजुरी दिलेली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

तालुक्यातील कोणत्याही खरेदी केंद्रावर शेतकरी धान विक्री करु शकतो. त्यामुळे धान खरेदीवर परिणाम झालेला नाही.

गोंदिया जिल्ह्यात मार्केटिंग फेडरेशनमार्फत उघडण्यात आलेल्या ११५ धान खरेदी केंद्रांपैकी ९६ केंद्रांवर नोव्हेंबर अखेर २९९८८१.६० क्विंटल धानाची खरेदी झालेली आहे.

उर्वरित १९ खरेदी केंद्र सुरु न केल्यामुळे संबंधित खरेदी केंद्रांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

आदिवासी विकास महामंडळामार्फत गोंदिया जिल्ह्यात उघडण्यात आलेल्या २६ खरेदी केंद्रावर धान खरेदी सुरुळीत सुरु असून, दि.१४.१२.२०२२ अखेर ६४५९०.४८ क्विंटल धानाची खरेदी झालेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जानवळ (ता.चाकुर,जि.लातूर) येथील शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(२४) * ५०५८८ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जानवळ (ता.चाकूर जि.लातूर) येथे सन १९१८ मध्ये १ ली ते ७ वी पर्यंतसाठी बांधण्यात आलेल्या केंद्रीय प्राथमिक शाळेत एकूण १७९ विद्याथी शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळेच्या इमारतीला अनेक ठिकाणी तडे गेल्याने सदरहू इमारत धोकादायक झालेली असून दुषित पाणी पुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इमारतीत अत्यंत अस्वच्छ ठिकाणी शालेय पोषण आहार शिजवून त्याचे वाटप करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या एकूण ३ इमारती पैकी १ इमारत धोकादायक झाली आहे. शाळेच्या आवारात ग्राम पंचायतीमार्फत फिल्टर्ड पाण्याचे जार पुरविण्यात येतात.

(३) हे खरे नाही.

शालेय पोषण आहार स्वच्छ स्वयंपाक गृहामध्ये शिजवून वाटपाच्या ठिकाणी ही उचित खबरदारी घेतली जाते.

(४) जिल्हा परिषदेकडून वर्ग खोल्यांची निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा परिषद सेस फंड, आमदार-खासदार निधी, चौदावा/ पंधरावा वित्त आयोग व सी.एस.आर इत्यादी माध्यमांतून वर्गखोली बांधकामाची तजवीज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शालेय पोषण आहार पुरवठयामध्ये कंत्राटदाराने गैरव्यवहार केल्याबाबत

**(२५) * ५०९४८ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहाराचा पुरवठा कंत्राटदारांमार्फत थेट शाळेत केला जात असताना नागपूर जिल्हयातील किमान ५०० शाळांना ४० दिवसांच्या आहारामध्ये १५ दिवसांच्या आहाराचा पुरवठा केला नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, बुलढाणा जिल्ह्यातील २ लाख ६८ हजार विद्यार्थी १९७ दिवसापासून पोषण आहारापासून वंचित असल्याचेही निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी चौकशी करुन पुरवठादारावर कारवाई करावी असा अहवाल शिक्षण संचालनालयाकडे पाठविलेला असतांनाही पुरवठादारावर अद्यापही कारवाई झाली नाही हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.
प्रस्तुत योजनेतंर्गत विहित कालावधीत पुरवठा करण्यास विलंब झाला होता.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे संबंधित पुरवठादारावर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्ह्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(२६) * ५०३७० श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयात पावसामुळे जुना उपळा रस्त्यासह अनेक रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली असून बेंबळी (ता.उस्मानाबाद) मार्गे उस्मानाबाद ते उजनी (ता.औसा, जि.लातूर) रस्त्याचे काम विभागाच्या दुर्लक्षामुळे अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, उस्मानाबाद बसस्थानक ते भवानी चौक सांजा रोडची दुरुस्ती करणे तसेच भवानी चौक सांजा रोड ते चिखली या रु. ४.५ कोटी रुपयांच्या मंजूर रस्त्याला दिलेली स्थगिती तात्काळ उठवून काम सुरु करण्याकरिता माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विरोधात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अपघात होत असून जीवित हानी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) राष्ट्रीय महामार्ग (NH-५२) ते उपळा रस्ता कि.मी.०/०० ते ५/०० हा ग्रामीण मार्ग दर्जाचा असुन मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत मंजूर काम मार्च, २०२२ मध्ये पुर्ण करण्यात आले आहे. सद्यस्थितीत रस्ता सुस्थितीत आहे.
तसेच सा.क्र.४/६०० मध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत मंजूर पुलाचे काम प्रगतीत आहे.
उस्मानाबाद बेंबळी उजनी रामा-२३८ या रस्त्यावर हायब्रीड ॲन्यईटी योजने अंतर्गत मंजूर काम सद्यस्थितीत भौतिकदृष्टया ४२% पुर्ण झाले असून सदरचे काम मार्च-२०२३ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(२) आंदोलन झाले होते हे खरे आहे.
(३) प्रश्नांकित रस्त्याच्या लांबीत अपघात झाल्याची नोंद नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
सा.बां.विभागाने २३/०७/२०२२ च्या पत्रान्वये स्थगित केलेल्या कामांचे पुनर्विलोकन करुन सर्व नविन इमारती बांधणे, इमारतींची देखभाल व दुरुस्तीची कामे, धुपप्रतीबंधक बंधारे, घाट रस्ते, नवीन पुल व पुलांची दुरुस्ती, रेल्वे उड्डाणपुल तसेच काही रस्त्यांचे डांबरीकरण व मजबुतीकरण व दुरुस्तीची कामे या वरील स्थगिती उठविण्यात आली आहे.

स्थगित केलेल्या उर्वीरत कामांचे पुनर्विलोकन करुन यथायोग्य निर्णय घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे मोडनिंब (ता.माढा, जि.सोलापूर) येथील उड्डाणपूलाचे काम निकृष्ट झाल्याबाबत**

**(२७) * ५१३२८ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर मोडनिंब (ता.माढा जि.सोलापूर) येथील उड्डाणपुलाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने पुलाच्या दोन्ही बाजुंच्या संरक्षक भिंती धोकादायक स्थितीत असून पुलावरुन शालेय विद्यार्थी व नागरिकांची सतत वाहतूक सुरु असून तेथे अपघाताच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मतदारसंघातील रस्ते देखभाल दुरुस्तीसाठी रस्तेनिहाय तरतुद केलेल्या निधीमधून रस्ते दुरुस्तीची कामे न झाल्यामुळे विविध राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्गाची दुरवस्था होऊन अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी क्षेत्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्र व्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, माढा विधानसभा मतदारसंघातील सन २०२१ व माहे मार्च, २०२२ या दोन वर्षाअखेर राज्यमार्ग प्रजिमा या रस्त्याचे डांबरीकरण, खड्डे बुजविणे, रस्ते दुरुस्ती करणे, व रस्त्यांची देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाने किती निधीची तरतुद केलेली आहे व त्यामधून किती रस्त्यांची दुरुस्ती केली त्याचा तपशील काय आहे.

(४) नसल्यास, विलंबाचर कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) सोलापूर-पुणे या राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

काही ठिकाणी किंचित फुगलेल्या संरक्षक भिंतीची दुरुस्ती सन २०१६ मध्ये करण्यात आली होती. तथापी संरक्षक भिंतीची कायमस्वरुपी दुरुस्तीच्या उपाययोजना करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

सदर अपघात हे अतिवेगाने व ओव्हरटेक करणे या कारणामुळे झाले आहेत.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधींचे पत्र प्राप्त झाले आहे.

(३) सन २०२२-२३ रस्ते दुरुस्तीची रुपये ३४२.८० लक्ष एवढया किंमतीची १३ कामे प्रगतीत आहेत व खर्च निरंक आहे. सन २०२१ मध्ये डांबरीकरणाची रु.१५७०.०० लक्ष एवढया किंमतीची ९ कामे मंजूर असून त्यावरील खर्च ६८३.५७ लक्ष आहे.सन २०२२ मध्ये १६४७.५० लक्ष किंमतीची एकूण १२ कामे मंजूर असून ९ कामांना स्थगिती आहे व ३ कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.त्याची किंमत रु.१२४०.०० लक्ष आहे.

पंढरपूर तालुक्यातील माढा विधानसभा मतदारसंघामध्ये मार्च २०२१ अर्थसंकल्पातून एक काम व मार्च २०२२ अर्थसंकल्पातून १ काम अशी दोन कामे रक्कम रु.७७५.०० लक्ष रकमेची काम मंजूर झाली, त्यापैकी मार्च २०२२ मध्ये मंजूर कामाला स्थगिती मिळालेली आहे. अर्थसंकल्पातून ६.७०० कि.मी. लांबीमध्ये काम सध्या प्रगतीत आहे.विशेष दुरुस्ती कार्यक्रमातून सन २०२२ मध्ये १४.०२ कोटी रकमेचे १०.७०० कि.मी. लांबीच्या दुरुस्तीसाठी काम नुकतेच मंजूर झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आधारभूत किमंतीत धान खरेदीमध्ये घट निर्माण झाल्याने शासनाकडून एक टक्का रक्कम धान संग्रह संस्थेला मिळणेबाबत**

**(२८) * ५०४३९ श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत सन २०११-१२ चे हंगामापर्यंत धान खरेदी करणाऱ्या संस्थांना उशीरा उचल

व उष्णतेमुळे होणाऱ्या घटीसाठी राज्य शासन व केंद्र शासन प्रत्येकी १ टक्का घट म्हणून दिली जात होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२-१३ च्या हंगामापासून शासनाने १ टक्के घट देणे बंद केले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२०-२१ व २०२१-२२ हंगामामध्ये खरीप मालाची उचल सहा महिन्यांपेक्षा अधिक उशिर झाल्यामुळे १ टक्क्याच्या वर झालेल्या घटीला धान खरेदी संस्थांना जबाबदार धरुन त्यांचेवर घट लादण्यात आल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सन २०२१-२२ चा धान खरेदीचा बोनसही शासनाकडून अद्याप देण्यात आला नसल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आधारभूत किंमतीत धान खरेदी करणाऱ्या संस्थांना घटीची प्रलंबित रक्कम तसेच धान खरेदीचा बोनस अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१), (२) व (३) किमान आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र पुरस्कत योजना आहे. केंद्र शासनाचे निदेशानुसार धान साठवणुकी दरम्यान केवळ १% घट (Driage) अनुज्ञेय आहे.

तथापि, खरीप पणन हंगाम २००८-०९ ते २०११-१२ मधील धानाच्या साठवणूकी दरम्यान आलेली घट/तूटीबाबत केंद्र शासन १% व राज्य शासन १% याप्रमाणे घट/तूट मंजूर करण्यात आलेली आहे.

उक्त योजनेंतर्गत खरेदी शासन निर्णयातील तरतूदीनुसार कोणत्याही परिस्थितीत दोन महिन्यांचेवर धान गोदामात राहणार नाही, याची दक्षता अभिकर्ता संस्थांनी घ्यावयाची आहे. विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अभिकर्ता संस्थाची आहे.

(४) व (५) पणन हंगाम २०२१-२२ मध्ये धानाला हमीभावाव्यतिरिक्त प्रोत्साहनपर राशी (बोनस) जाहीर करण्यात आलेला नाही.

केंद्र शासनाच्या निदेशानुसार १% पेक्षा अधिक घट (Driage) अभिकर्ता संस्थांना अनुज्ञेय नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महागांव ते वारंगा ( जि.यवतमाळ) राष्ट्रीय महामार्गावर ठिकठिकाणी पडलेल्या खड्डयामुळे रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(२९) * ५१५७५ श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव ते वारंगा (जि.यवतमाळ) राष्ट्रीय महामार्गावर ठिकठिकाणी पडलेल्या खड्डयामुळे सदर मार्ग मृत्यूचा सापळा बनल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नागपूर-बोरी-तुळजापूर या नॅशनल हायवे ३६१ चे महागांव ते वारंगा रस्त्यांचे काम अद्याप पूर्ण झालेले नसतानाही वाहनधारकांकडून टोल वसूल करण्यात येत असून नागपूर –तुळजापूर मार्गावरील आर्णी ते मार्लेगांव दरम्यान आतापर्यंत ९६ अपघात होऊन त्यात ४९ जणांचा मृत्यू व ११४ जण गंभीर जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यांसदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

महागांव ते वारंगा (जि.यवतमाळ) राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे नाही.

वारंगा ते महागाव हे काम अद्यापपर्यंत पूर्ण झाले नसल्याने या रस्त्यावर वाहनधारकांकडून टोल वसूल करण्यात येत नाही. सद्यस्थितीत कामाची प्रगती ७८.२२% एवढी असून एकूण ६६.८८ कि.मी. लांबीपैकी ५६.५० कि.मी. चौपदरीकरण पूर्ण झालेले आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने मे.राईटस लिमीटेडला सुरक्षा सल्लागार म्हणून आधीच तैनात केले आहे आणि ते या साईटला नियमीतपणे भेट देत असतात व स्थानिक पोलीस ठाण्याकडून अपघाताची माहिती गोळा करत आहेत व अपघाताचे सविस्तर विश्लेषण जमा करतात. मार्लेगाव ते महागाव या महामार्गावर गेल्या ४ वर्षा मध्ये ५१ अपघात झाले असून त्यामध्ये २५ जणांचा मृत्यु झालेला आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ चा महागाव ते यवतमाळ हा भाग असून त्याच्या ७९.९९५ कि.मी. लांबी पैकी ७७.७०७ कि.मी.लांबीचे चौपदरीकरण पूर्ण झाले असून सदर पूर्ण लांबीसाठी पथकर नाक्यावर पथकर आकारण्यात येत आहे.

(३) सवलतदाराकडून रस्त्याची देखभाल न केल्यामुळे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने कंसेशनायरच्या जोखीम व खर्च तत्वावर अपत्कालीन दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक मंजूर केले आहे. यासंदर्भात LOA मे.ई.के.के.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.केरळ यांना देण्यात आले आहे.

कंसेशनायरच्या विलंबामुळे प्राधिकरणाने दि.०३.११.२०२२ रोजी कंसेशनायर M/s Sadhbav Vidarbh Highway Pvt. Ltd. यांना करार समाप्त करण्याच्या हेतुसाठी नोटीस देण्यात आली आहे. तसेच वरिष्ठ कर्जदार M/s Axis Bank Ltd. यांनी दि.१५.११.२०२२ रोजीच्या विनंतीनुसार प्राधिकरणातील सक्षम प्राधिका-याची मान्यतेनुसार पर्यायी कंसेशनायर म्हणून M/s Kalyan Toll Infrastructure Pvt.Ltd यांना मान्यता दिली आहे. पुरवणी करार क्षेत्रीय कार्यालय,नागपूर यांच्याकडे सादर केलेला आहे. करारनामा झाल्यानंतर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

महागाव ते यवतमाळ राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ च्या लांबीमध्ये केवळ भूसंपादन न्यायप्रविष्ट प्रकरणांमुळे पूर्ण झाले नसल्यामुळे हिवरा संगम व दत्तारामपूर येथील २.२९ कि.मी. लांबीचे चौपदरीकरण शिल्लक असून त्याठिकाणी रस्ते दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------------------

## पुणे येथील हडपसर-सासवड या राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(३०) * ४९५३८ श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील हडपसर-सासवड या राष्ट्रीय महामार्गाच्या हडपसर ते दिवेघाट या टप्प्यातील महामार्गाची अत्यंत दूरवस्था झाल्यामुळे वाहतुककोंडी होऊन अपघाताचे प्रमाण वाढत असल्यामुळे सदर रस्ता दुरुस्तीच्या मागणीकरिता स्थानिक नागरिकांनी माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रस्ता दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

(२) मोहोळ-पंढरपूर-आळंदी या राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

सदर महामार्गावरील हडपसर ते दिवेघाट या लांबीमध्ये जून ते ऑक्टोबर या कालावधीमध्ये दोन वेळा ढगफुटी होऊन पावसाचे प्रमाण नेहमीपेक्षा जास्त झाल्यामुळे तसेच स्थानिक व्यवसाय धारकांनी रस्त्याच्या पातळी पेक्षा सर्व बांधकामे वर बांधली असून त्याचे सांडपाणी रस्त्यावर येत असल्यामुळे पावसाच्या काळात काही खड्डे पडले होते. ते वेळोवेळी बुजवून रस्ता वाहतुकीस योग्य ठेवण्यात येत होता. मान्सून संपल्यानंतर सदर रस्त्याचे मजबुतीकरण करुन आवश्यक त्या ठिकाणी रस्त्याचे नुतनीकरण करणेत आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लासलगांव-विंचूर (जि.नाशिक) रस्त्याचे हायब्रीड ॲन्यूईटी मॉडेल या योजनेतून चौपदरीकरण करणेबाबत**

**(३१) * ४९९१७ श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगांव-विंचूर (जि.नाशिक) रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाचा हायब्रीड ॲन्यूईटी मॉडेलमध्ये समावेश करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाअन्वये मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लासलगांव ते विंचूर या रस्त्यावर वाहनांची अधिक वर्दळ असल्यामुळे येथे माहे जानेवारी, २०२२ ते माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत ९ अपघात होवून पाच व्यक्तींचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लासलगांव विंचूर रस्ता रा.मा. क्र.७ या रस्त्याचे हायब्रीड ॲन्यूईटी मॉडेल या योजनेतून चौपदरीकरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय, मा. लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त आहे.

(२) माहे जानेवारी, २०२२ ते नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत झालेल्या अपघातांमध्ये वाहनांची धडक झाल्याने, वाहन घसरल्याने, भरधाव वेगाने वाहन चालविल्याने ७ व्यक्तींचा मृत्यू झाल्याची नोंद लासलगाव पोलीस ठाणे येथील FIR मध्ये आहे.

(३) निधी, निकष व प्राधन्यक्रमानुसार सदरचे काम हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत समाविष्ट करणेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणानंतर भोस्ते (ता.खेड, जि.रत्नागिरी) घाटातील वळण अधिक धोकादायक झाल्याबाबत**

**(३२) * ४९७५० श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणानंतर रत्नागिरी जिल्हयातील भोस्ते (ता. खेड) घाटातील वळण आधीपेक्षा अधिक धोकादायक झाले असून पूर्वीपेक्षा तीव्र उतार करण्यात आल्याने तसेच या रस्त्याचे काम संथ गतीने सुरु असल्याने दररोज अपघात होऊन जीवित आणि वित्तहानी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीव्र उतार व अवघड वळणामुळे वाहनांचे अपघात होवून संरक्षण भिंतीला देखील तडे गेल्यामुळे भविष्यात येथील अपघातांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथे होणारे मोठे अपघात टाळण्यासाठी या धोकादायक वळणाचे विस्तारीकरण व उताराची तिव्रता कमी करण्याची आवश्यकता असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) अंशत:खरे आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वर सदर ठिकाणी, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय,नवी दिल्ली यांचे मार्फत नियुक्त डी.पी.आर.तांत्रीक सल्लागार यांचेमार्फत भौगोलिक स्थान,उपलब्ध जागा व IRC मानक विचारात घेवुन भोस्ते घाटातील वळण मार्गाचे संकल्प चित्रे (Design and Drawing) तयार करताना Limiting Gradient व Hair Pin Bend एकत्र घेतल्यामुळे सदर वळण धोकादायक झाले आहे. तसेच सदर ठिकाणी मुंबईकडे जाताना डाव्या बाजुस असलेल्या दरी भागामुळे व तेथील लोकवस्तीमुळे सदर ठिकाणी भूसंपादन करताना मर्यादा आल्या असल्याने उपलब्ध भूसंपादीत जागेत रस्त्याचे बांधकाम करावे लागल्याने भोस्ते घाटातील वळण मार्ग धोकादायक झालेला आहे.

(२) भोस्ते घाटामध्ये वळण मार्गाच्या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने दरीकडील भागामध्ये संरक्षक भिंत बांधण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी काही वाहनांच्या झालेल्या अपघातांच्या घटनांमुळे नुकसान झालेल्या संरक्षक भिंतीची वेळोवेळी दुरुस्ती कंत्राटदारामार्फत करण्यात येते. तसेच आवश्यक त्या सुरक्षा उपाययोजना करण्यात येऊन रस्ता वाहतूकीस सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.
(३) भोस्ते घाटामध्ये धोकादायक वळणाचे विस्तारीकरण व उताराची तिव्रता कमी करण्यासाठी मे.इंडीया इन्फ्राटेक, सुरक्षा तांत्रीक सल्लागार व स्वतंत्र अभियंता,मे.ब्लुम कंपनी यांचेमार्फत तांत्रीक परीक्षण करण्यात येत असून, त्यांनी दिलेल्या अहवालानुसार कायम स्वरुपी उपाययोजना कंत्राटदारामार्फत राबविण्यात येणार आहेत.
तसेच सुरक्षा तांत्रीक सल्लागारामार्फत ऑडीट करण्यात आले आहे व त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार संबंधीत कंत्राटदार मे.कशेडी परशुराम हायवेज प्रा.ली.यांचे मार्फत गतीरोधक, दिशा दर्शक फलक,कॅट आईज लावणे इ. तात्पुरत्या उपाययोजना करण्यात आल्या असुन रस्ता वाहतूकीस सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उसर (ता.अलिबाग, जि. रायगड) येथील गेल इंडीया लि.च्या प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या शेतक-यांच्या जमिनींबाबत**

**(३३) * ५२८११ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उसर (ता.अलिबाग, जि. रायगड) येथील गेल इंडीया लि. च्या प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या शेतक-यांच्या जमिनींचा योग्य तो मोबदला देणे, प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेणे तसेच विविध मागण्यांसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पालकमंत्री यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी अलिबाग तालुक्यातील नाईक कुणे, कंटक कुणे, धसाडे कुणे, उसर, धोटवडे, मल्याण या ६ गावातील २४७ शेतक-यांच्या जमिनी गेल इंडिया लि. कंपनीने संपादित केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत : (**१) होय,हे खरे आहे.
सदर प्रकरणी दि.१३.०९.२०२२ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रकल्पग्रस्तां समवेत बैठक घेण्यात आली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
उसर औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याकरीता संपादीत करण्यात आलेल्या जमिनी या मे. गेल इंडीया लि.कंपनीने संपादन केलेल्या नसून, म.औ.वि.महामंडळाने संपादित केलेल्या आहेत.
म.औ.वि. महामंडळाने मौजे खानाव,उसर,कुणे व मल्याण या गावातील संपादित केलेल्या २१७.१८८ हे.आर क्षेत्रापैकी मे. गेल इंडिया लि. कंपनीस वाटप करण्यात आलेल्या १८९.८४ हे.आर क्षेत्रापैकी १३०.०० हे.आर क्षेत्रावर प्रकल्प कार्यान्वित असून उर्वरित ५९.८४० हे.आर क्षेत्राचा ताबा मे. गेल इंडिया लि. ला देण्याची कार्यवाही मऔवि महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नायगांव (जि.नांदेड) येथील हायब्रीड ॲन्युईटी मॉडेल (एचएएम) ची कामे विहित मानकांप्रमाणे करण्यात आलेली नसल्याबाबत**

**(३४) * ५२३२० श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील नायगाव मतदार संघातील हायब्रीड ॲन्युईटी मॉडेल (एचएएम) ची कामे विहित मानके व मापदंडाप्रमाणे झालेली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामे मानकाप्रमाणे झाली नसल्यास कंत्राटदारांची देयके अदा न करण्याची तसेच यात दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी मा.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांच्याकडे लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१), (२) व (३) मा. लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अहवालातील निष्कर्षानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खाजगी महाविद्यालयांमध्ये नियमाबाह्य पध्दतीने होणाऱ्या मॅनेजमेंट कोट्यातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत**

**(३५) * ४९८८७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खाजगी महाविद्यालयांमध्ये नियमबाह्य पद्धतीने मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून (एआरए) मान्यता मिळणार नाही असे प्राधिकरणाच्या सचिव आणि राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षाचे (सीईटी सेल) आयुक्त यांनी तंत्र शिक्षण संचालनालयाचे (डीटीई) संचालक यांना दिनांक ०८ ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी आदेश दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील इंजिनिअरिंग, मॅनेजमेंट, फार्मसी, लॉ, आर्किटेक्चर आणि एमसीए महाविद्यालयांनी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून सीईटी सेल, व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेचे गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यापूर्वीच नियमबाह्यरित्या व्यवस्थापन कोट्यातील सर्व जागा परस्पर भरण्यात आल्याचे उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या कॅप फेऱ्या झाल्यानंतर आणि गुणवत्ता याद्या तयार करून खाजगी महाविद्यालयातील जागा भरल्या जाव्या असा नियम असतानाही राज्यातील नामवंत खाजगी शिक्षण संस्थांनी माहिती पुस्तकेतील नियम क्रमांक १३ च्या नियमावलीचे उल्लंघन केले असल्याचे उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय.
(२), (३) व (४) राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विदयार्थ्यांच्या प्रवेशासंदर्भात राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी प्रवेश नियमांतील तरतुदींनुसार संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्यांक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवरील प्रवेश प्रक्रिया ही महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रवेशांचे विनियमन) नियम २०१७ मधील नियमांनुसार राबविण्याबाबत राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने दि.०७.१०.२०२२ च्या पत्रान्वये तंत्रशिक्षण संचालनालयास कळविले आहे.

त्यानुसार तंत्रशिक्षण संचालनालयाने दि.१०.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना सूचित करण्यात आले आहे.

तसेच व्यवस्थापन कोटयातील जागेसंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीची चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत तंत्रशिक्षण संचालनालयास निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार तक्रारीची चौकशी करुन अहवाल सादर करण्याची बाब तंत्रशिक्षण संचालनालयाच्या स्तरावर कार्यवाहीखाली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विविध ठिकाणी गुटखा व पान मसाला या प्रतिबंधीत पदार्थाचा साठा व विक्री होत असल्याबाबत

**(३६) * ५०८११ श्री.अजित पवार (बारामती), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: पुणे, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, बीड येथे लाखो रुपये किंमतीचा गुटखा व पान मसाला या प्रतिबंधीत पदार्थाचा साठा व विक्री होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच मोहोळ (जि.सोलापूर) शहराच्या चारही बाजूने जाणाऱ्या महामार्गांवर ढाबा काढून दारू, पेट्रोल आणि डिझेलचाही काळाबाजार होत असल्याचेही निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, गुटखा व त्यासारख्या पदार्थांवर बंदी असतानाही अधिकाऱ्यांच्या जाणीवपूर्वक होणाऱ्या दुर्लक्षपणामुळे तसेच संगनमताने अनधिकृतपणे गुटखा विक्री होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून वारंवार करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यातच गुटखा विक्रीच्या नावाखाली दुकानदारांना विनाकारण त्रास देऊन हप्ते वसुलीचे प्रकार शासकीय अधिकाऱ्यांकडून होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अवैध गुटखा विक्री तसेच दुकानदारांकडून हप्ते वसुलीबाबतच्या तक्रारींसंदर्भात चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी बीड येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ सप्टेंबर,२०२२ व दिनांक ०५ नोव्हेंबर,२०२२ रोजी पत्रान्वये मा.मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री,अन्न व औषधे प्रशासन मंत्री तसेच मा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांच्याकडे केली, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
मोहोळ (जि.सोलापूर) पोलीस ठाणे हद्दीतील महामार्गावरील ढाब्यात व ढाब्याचे आजुबाजुच्या परिसरात अवैध दारु विक्री, पेट्रोल व डिझेल विक्री होत नाही व तसे आढळल्यास त्यावर तात्काळ कारवाई करण्यात येते.
(३) गुटखा व तत्सम पदार्थांवर बंदी असतानाही अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात ही बाब खरी नाही. तथापि, अशा स्वरुपाच्या तक्रारी नागरीकांकडून अन्न व औषध प्रशासनास प्राप्त होत असतात व सदरच्या तक्रारीच्या अनुषंगे अन्न व औषध प्रशासनाकडून सखोल चौकशी करण्यात येते.
अन्न व औषध प्रशासनाच्या दक्षता विभागास माहे एप्रिल २०२२ ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत प्रतिबंधित अन्न पदार्थांच्या अनुषंगे अधिकाऱ्यांच्या संदर्भात ४ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारींचे अनुषंगे ३ प्रकरणात चौकशी करण्यात आली असून सदर तक्रारींमध्ये तथ्य नसल्याचे चौकशीअंती आढळून आले आहे. उर्वरीत १ प्रकरणात चौकशी सुरु आहे.
(४) हे खरे नाही.
(५) हे खरे आहे.
(६) दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ व दिनांक ०५ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या पत्रान्वये विधानसभा सदस्य, बीड यांनी सहायक आयुक्त (अन्न), अन्न व औषध प्रशासन,बीड यांचेकडून होत असलेल्या भ्रष्टाचाराबाबत केलेल्या तक्रारीचे अनुषंगे सखोल चौकशी करण्यात आली असून सदर तक्रारीमध्ये तथ्य नसल्याचे आढळून आलेले आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यंत्रमाग उद्योगाशी निगडित "टफ" योजना बंद करण्यात आल्याबाबत**

**(३७) * ५०६२७ श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील यंत्रमागधारकांना टेक्नॉलॉजी अपग्रेडेशन फंड स्कीम (टफ योजना) योजनेअंतर्गत यंत्रमाग उद्योजकांना दिनांक ३१ मार्च, २०२२ पुर्वी २० टक्के तसेच नवीन यंत्रमाग खरेदी केल्यानंतर केंद्र शासनाकडून २० टक्के अनुदान तसेच यंत्रमागाच्या बॅक प्रोसेसमधील खरेदीला अनुदान देण्यात येत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेस वेळोवेळी अनेकदा मुदतवाढ देण्यात आली परंतु दिनांक ३१ मार्च, २०२२ पासून केंद्र शासनाने सदर योजना बंद केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक यंत्रमाग उद्योजकांनी यापूर्वी टफ योजनेचा लाभ घेतला असून विशेषत: सोलापूर जिल्ह्यात मागील पाच वर्षात दोन हजाराहून अधिक शटललेस पॉवर लुम्स व दहा हजार पाचशे पारंपारीक (शटल लुम्स) सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजना बंद पडल्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील यंत्रमाग उद्योगातील अत्याधुनिकीकरण पूर्णपणे थांबले असून यंत्रमाग उद्योगावर होणारा परिणाम लक्षात घेता सदर टफ योजना शासनाने पुन्हा सुरु करावी अशी मागणी सोलापूर जिल्हा यंत्रमागधारक संघाने राज्य शासन तसेच केंद्र शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय.

(२) होय, सदर योजना दि. ३०/०३/२०१३ रोजी बंद करण्यात आली असल्याचे केंद्र शासनाचे पत्र दि.०८/१२/२०२२ अन्वये कळविले आहे.

(३) सोलापूर जिल्हातील यंत्रमागाची माहिती केंद्र शासनाकडून प्राप्त झाली नाही. तथापि BTRA PSC, यांचे मार्फत प्राप्त माहिती नुसार केंद्र शासनाकडुन सन २०१२-१३ मध्ये यंत्रमाग गणना झाली होती. सोलापूर कल्स्टर मध्ये अंदाजे १८०० शटललेस लुम्स व १२२०० प्लेन पॉवरलुम्स आहेत.

(४) होय, केंद्र शासनाकडे मागणी केली आहे.

(५) व (६) केंद्र शासनाशी संबंधीत आहे.

-----------------

**मुंबई -आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील कसारा घाट रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(३८) * ४९६१७ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई -आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील कसारा घाटातील रस्त्याचे कोटयावधी रुपये खर्च करुन केलेले काम निकृष्ट झाल्याने रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई-नाशिक महामार्गावरील जुन्या घाटातील अंबा पॉइंटवर माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पिंक इन्फ्रा कंपनीने निकृष्ट दर्जाचे काम केल्याने रस्त्याला अनेक ठिकाणी तडे जाऊन कसारा घाटात एकेरी वाहतुक सुरु ठेवल्याने प्रवाशांची गैरसोय होत असून सदर रस्त्याची देखभाल, दुरुस्ती आणि टोल वसुलीचे कंत्राट घेतलेली पिंक इन्फ्रा कंपनी आणि या महामार्गाचे सुरुवातीला निकृष्ट काम करणाऱ्या गॅमन इंडिया कंपनी व्यवस्थापनाची चौकशी करुन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) मतदार संघातील मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्र.३ (एनएच-३) घोटी सिन्नर फाटा येथील रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली असल्याने सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करुन निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

रस्ता BOT अंतर्गत असून देखभाल व दुरुस्तीचा खर्च हा सवलतदारामार्फत करण्यात येतो.
(२) सदरहु जुन्या घाटात (कसारा घाटात) जुलै २०२२ मध्ये रस्त्याच्या कडेला सुमारे १०० मी. लांबीमध्ये तडे आढळले. उर्वरीत दोन पदरी रस्ता सुस्थितीत आहे. सवलतदाराने तडे पडलेल्या लांबीत प्लास्टीक बॅरीगेटस्लावुन वाहतुकीस कुठलीही अडचण होणार नाही, हयाची दक्षता घेतली आहे. सध्या या लांबीत वाहतुक सुरळीत सुरु आहे. घाटातील रस्त्यावरील नैसर्गिक तडयांची कारणे जाणुन घेण्याकरिता IIT मुंबई येथील भुगर्भशास्त्रातील नामांकीत प्राध्यापक आणि इतर जाणकार यांची नियुक्ती केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दुरुस्तीचे काम सवलतदाराकडुन करण्यात येत आहे.
(३) सदर निवेदन कार्यालयास प्राप्त झाल्याचे निदर्शनास येत नाही.
(४) मुंबई-आग्रा महामार्गावरील घोटी-सिन्नर जंक्शन हे केंद्रीय रस्ता मंत्रालयाने अपघात प्रवण (Blackspot) घोषित केले आहे. त्या अनुषंगाने तेथे उड्डाणपूल (Flyover) व भुयारी मार्ग (VUP) चे काम सुरु आहे. पावसाळयात पडलेले खड्डे हे पुर्णपणे बुजवण्यात आले आहेत.

कसारा घाटातील तडे हे भुगर्भातील हालचाली मुळे असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर रस्त्याची कामे ही MORTH Specification, IRC Code आणि Concession Agreement प्रमाणे करण्यात येत आहे. सद्यस्थितीत रस्ता सुस्थितीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे सातारा महामार्गावर अपघात प्रवण क्षेत्र निर्माण झाल्याने होत असलेले अपघात**

**(३९) * ५२३९९ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :-** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे ते सातारा महामार्गावर निकृष्ट दर्जाचे डांबरीकरण, महामार्गावर पडलेले खड्डे व अपूर्णावस्थेतील उड्डाण पुलांची कामे यामुळे अपघात प्रवण क्षेत्रे निर्माण झाली असून या मार्गावर गत ६ महिन्यात ८ जणांचा अपघाती मृत्यू झाल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिंदेवाडी ते खेड-शिवापूर टोल नाक्यापर्यत १६५ जागी अतिक्रमण झाले असून तसेच महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम कंत्राटदाराच्या बेजबाबदारपणामुळे मागील दहा वर्षापासून प्रलंबित असल्याने पुणे-सातारा महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून अनेक दुर्घटना होत असतानाही प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुणे-सातारा महामार्गाची सर्व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना/कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

सवलत करारामध्ये नमूद तांत्रिक बाबीनुसार प्रकल्पाची कामे पार पाडली जात आहेत आणि सवलतीच्या करारातील तरतुदीनुसार कामांच्या गुणवत्तेचे परीक्षण स्वतंत्र अभियंत्याद्वारे प्रमाणित केले जाते. रस्त्यावरील सर्व खड्डे भरण्यात आलेले आहेत. प्रगतीतील उड्डाणपुलाची कामे पूर्ण झालेली आहेत.

मागील ६ महिन्यातील झालेले अपघात हे वाहनांचा वेग जास्त असल्यामुळे, वाहनांच्या तांत्रिक बिघाडामुळे व चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्यामुळे झालेले आहे.

(२) महामार्गाच्या हद्दीत झालेली अतिक्रमणे वेळोवेळी हटविण्यात येतात. शिंदेवाडी ते खेड शिवापूर टोल नाक्या दरम्याने काही ठिकाणी रस्त्याच्या हद्दीत असणारी अतिक्रमणे काढण्यात आली असून उर्वरीत अतिक्रमणे काढणे प्रगतीत आहे.

सवलत करारानुसार प्रकल्प पूर्ण होण्याची नियोजित तारीख ३० मार्च,२०१३ होती. परंतू खालील कारणांमुळे प्रकल्प वेळेत पूर्ण होवू शकला नाही.

१) जमीन हस्तांतरित करण्यास विलंब
२) सेवा वाहिन्या स्थलांतरीत करतांना आलेल्या अडचणी
३) अतिरिक्त सुविधांसाठी जनतेची वारंवार मागणी
४) महामार्गाच्या हद्दीतील अतिक्रमणे काढणे
५) स्थानिकांकडून काम थांबवणे
६) रस्त्याच्या हद्दीतील धार्मिक स्थळांचे स्थलांतर करताना आलेले अडथळे.
७) भुयारी मार्गाचे ठिकाण व रुंदी मध्ये बदल करण्याची स्थानिकांकडून मागणी
८) मागील २ वर्षापुर्वी कोवीड प्रभावामुळे काम चालु ठेवण्यास अडचणी

सद्यस्थितीत महामार्ग सुस्थितीत असून वेळोवेळी देखभाल दुरुस्ती केली जाते. पुणे सातारा महामार्गाचे बहुतांशी काम ३०.०४.२०२२ पर्यंत पुर्ण झाले आहे.

(३) पुणे-सातारा महामार्गाचे ९७.५० टक्के काम पूर्ण झाले आहे. खालील ठिकाणी स्थानिक अडचणींमुळे कामे पूर्ण होवू शकली नाहीत.

अ) शिंदेवाडी जि.सातारा (७९६.५० कि.मी.) येथील उड्डाणपुलाच्या पोहोच मार्गातील अतिक्रमण काढण्यास स्थानिकांचा विरोध असल्यामुळे रस्त्याच्या कामास विलंब झाला. सद्यस्थितीत काम प्रगतीत आहे.

ब) किकवी, ता.भोर (कि.मी.८०१.१०५),शिवरे जि.पुणे (कि.मी. ८१७.३७) व खेड शिवापूर, जि.पुणे (कि.मी.८२०.३२) येथे स्थानिकांनी कामास विरोध केला व त्यांनी पूर्व नियोजित असलेल्या पादचारी भुयारी मार्ग/पादचारी उड्डाणपुलाऐवजी तेथे वाहन भुयारी मार्ग (व्ही.यु.पी.) ची मागणी केल्यामुळे सदरचा सुधारित प्रस्ताव भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे वरिष्ठ कार्यालयास मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. सदर मंजुरी प्राप्त झाल्यानंतर प्रलंबित कामे सुरु करण्यात येतील

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अन्न व औषध प्रशासन विभागातील रिक्त पदांबाबत

**(४०) * ४९७८१ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासन विभागाचा कार्यभार ८ हजार ५९७ कर्मचाऱ्यांवर अवलंबून असून अन्न व औषध प्रशासनाच्या बहुतांश कार्यालयामध्ये निम्यापेक्षा कमी क्षमतेने कर्मचारी कार्यरत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याचा विचार केला तर या खात्यांतर्गत हजारो कर्मचा-यांच्या जागा रिक्त असून वरिष्ठ अधिका-यांच्या ८० टक्के जागा रिक्त असल्याचे कळते, हे खरे आहे काय?

(३) असल्यास, खाद्यांन्नाची तपासणी करण्यासाठी सदर खात्याकडे संपूर्ण राज्यासाठी मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद येथे ३ प्रयोगशाळा उपलब्ध असून मुंबईच्या प्रयोगशाळेत ११४ पैकी ५० पदे आणि औरंगाबादच्या प्रयोगशाळेत ४० पैकी १२ पदे रिक्त आहेत, तसेच ४१ कर्मचारी क्षमतेच्या नागपूरच्या प्रयोगशाळेत एकही पुर्णवेळ कर्मचारी उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रयोगशाळेकडे दिवसाकाठी खाद्यांन्न आणि औषधांचे ५०० ते ६०० नमुने तपासणीसाठी येत असून कर्मचा-यांअभावी प्रत्येक नमुन्यांची वेळेच्या वेळी तपासणी होत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे नाही. अन्न व औषध प्रशासनातील १२७१ पदांचा सुधारित आकृतिबंध दि. ०४.०९.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेला आहे.

(२) अन्न व औषध प्रशासनात सद्यस्थितीत गट-अ व गट-ब संवर्गांत मिळुन एकूण ७९७ पदे मंजुर असुन त्यापैकी ३९४ पदे रिक्त आहेत.

(३) हे अंशतः खरे आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या नागपुर येथील प्रयोगशाळेसाठी ४१ पदे मंजुर असुन त्यातील २६ पदे सद्यस्थितीत भरलेली आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) अन्न व औषध प्रशासनातील रिक्त पदे पदोन्नतीने व सरळसेवेने भरण्याबाबतची कार्यवाही विविध स्तरावर सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरुड-एकदरा (ता.मुरुड, जि.रायगड) खाडीवरील एकदरा पुलाच्या दुरुस्तीबाबत

**(४१) * ५१८५८ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :**सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड-एकदरा (ता.मुरुड,जि.रायगड) खाडीवरील ६५ वर्षापूर्वीच्या एकदरा पुलाची दुरवस्था झाली असून दुरुस्तीअभावी पुल कोसळून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुल एकदरा, डोंगरी, माझेरी, आगरदाडा व राजपुरी आदी गावांना जोडणारा हा महत्वाचा पुल असून सदरहू पूलाची तातडीने दुरुस्ती वा पुर्नबांधणी करण्याबाबत ग्रामस्थांकडून वारंवार मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

पूलाच्या काही घटकांचे क्रॉक्रिट नादुरुस्त झाले आहे . तथापि पूल वाहतूकीस सुरळीत आहे.

(२)हे खरे आहे.

(३)सदर पुलाच्या स्ट्रक्चरल ऑडिट अहवालामध्ये सुचविल्याप्रमाणे पुलाच्या दुरुस्तीकरीता रक्कम रु.५०० लक्ष चे मंजूर कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम लवकरच कार्यान्वित करण्यात नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**परभणी-संबर (ता.जि.परभणी) रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(४२) * ५०१८१ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी-संबर (ता.जि.परभणी) रस्त्यावरील मटकऱ्हाळा ते संबर या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले असून परिसरातील संबर, पिंपळगाव, टोंग, देवठाणा व सावंगी दुर्ख या गावातील ग्रामस्थ, विद्यार्थी, रुग्ण यांना परभणीला येण्यासाठी कोणताही पर्यायी रस्ता नसल्यामुळे अशा धोकादायक रस्त्यांवर त्यांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांसह विविध संघटनांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली असून तात्काळ काम सुरु न झाल्यास दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ पासून रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने उक्त रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) प्रश्नाधीन ३ कि.मी. लांबीपैकी १ कि.मी. लांबीत डांबरीकरणाचे काम पुर्ण करण्यात आले असून रस्ता सुस्थितीत आहे.

उर्वरित २ कि.मी. लांबीत डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे. सद्यस्थितीत रस्त्यावरील खड्डे भरण्यात आले असून रस्ता वाहतूकीकरीता सुरळीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात ग्लिसरीनचा अवैधरित्या वापर होत असल्याबाबत**

**(४३) * ४९४५० श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वैद्यकिय वापरासाठी असलेल्या ग्लिसरीनसाठी अन्न व औषध प्रशासनाचा परवाना लागत असल्यामुळे त्यावर एफडीएचे नियंत्रण असते परंतु औद्योगिक वापरासाठी असलेल्या ग्लिसरीनसाठी एफडीएच्या परवान्याची गरज नसल्यामुळे ते एफडीएच्या नियंत्रणात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय वापरासाठी असलेले ग्लिसरीन राष्ट्रीय औषध निर्माण दर प्राधिकरणाच्या नियमाखाली आल्याने सदर ग्लिसरीनच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात औद्योगिक वापरासाठीच्या ग्लिसरीनचा वापर सर्रासपणे वैद्यकीय वापरासाठी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एफडीएचे औद्योगिक वापराच्या ग्लिसरीनवर नियंत्रण नसल्याने यासंदर्भात अनेक तक्रारी प्राप्त होवून देखील एफडीएला या प्रकरणी कोणतीही कारवाई करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, औद्योगिक वापरासाठी असणाऱ्या ग्लिसरीनवर अन्न व औषध प्रशासन विभागाचे नियंत्रण आणण्यासाठी शासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, राज्यात औद्योगिक ग्लिसरीनच्या वैद्यकीय वापरावर प्रतिबंध करण्याकरिता अन्न औषध प्रशासन विभागाला अधिकार देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) असल्यास, उक्त गंभीर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार भेसळयुक्त ग्लिसरीनच्या वापरावर नियंत्रण आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) खरे नाही.

राष्ट्रीय मूल्य निर्धारण प्राधिकरणाने "ग्लिसरीन ओरल लिक्वीड (Glycerin Oral Liquid) " या औषध फॉरम्यूलेशनची किंमत निश्चीत केली आहे. वैद्यकीय वापरासाठीच्या ग्लिसरीन (Pharmacopeal Glycerin) ची किंमत राष्ट्रीय मूल्य निर्धारण प्राधिकरणाने निश्चित केलेली नाही. औद्योगिक वापरासाठीचे ग्लिसरीन हे औषध या व्याख्येत मोडत नसल्याने त्यावर अन्न व औषध प्रशासनाचे नियंत्रण नाही. जेथे ग्लिसरीनचा वापर वैद्यकीय कारणासाठी केला जातो त्या प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार अन्न व औषध प्रशासनाला आहेत. औषधे व सौंदर्यप्रसाधने कायदा १९४० व त्याअंतर्गत नियमानुसार ग्लिसरीन व इतर द्रव्ये हे फार्माकोपीयल दर्जाचे वापरणे बंधनकारक आहे.
(६) व (७) औद्योगिक ग्लिसरीन वैद्यकीय वापरासाठी वापरणे प्रतिबंधित आहे. औद्योगिक ग्लिसरीनचा वैद्यकीय वापर होत असल्याचे आढळल्यास त्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार अन्न व औषध प्रशासनास आहेत व त्यानुसार वेळोवेळी कारवाया करण्यात येतात.
(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाकडून देण्यात येणारा आनंदाचा शिधा लाभार्थ्यांना मिळाला नसल्याबाबत

**(४४) * ४९७९६ श्री.चेतन तुपे (हडपसर), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत शिधापत्रिका धारकांना दिवाळीनिमित्त "आनंदाचा शिधा" १०० रुपयात उपलब्ध करून देण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिवाळीपूर्वीच या वस्तुंचे वितरण होणे आवश्यक असताना राज्यात अनेक ठिकाणी दिवाळी उलटूनही या वस्तुंचे वाटप होवू शकले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कित्येक रेशन दुकानात हा शिधा वेळेत न पोहोचणे, मिळालेल्या वस्तू अपुऱ्या व निकृष्ट दर्जाच्या असणे, पात्र लाभार्थ्यांना या शिध्याचे वाटपही न होणे तसेच कित्येक ठिकाणी १०० रुपयाचा शिधा ३०० रुपयांना विकल्याची अनेक प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे. दिवाळीनिमित्त सर्व जिल्ह्यांना शिधाजिन्नस संच उपलब्ध करण्यात आले आहेत. क्षेत्रीय कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या अहवालांनुसार पात्र शिधापत्रिकाधारकांपैकी ९६ टक्के शिधापत्रिकाधारकांनी शिधाजिन्नस संचांचा लाभ घेतला आहे. शिधापत्रिकाधारकांना निकृष्ट दर्जाचे शिधाजिन्नस प्राप्त झाल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच, शिधाजिन्नस संचांचे वितरण महाग दराने केल्याबाबत दोन तक्रारी आढळून आल्या आहेत.

(४) क्षेत्रीय कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या अहवालांनुसार शिधाजिन्नस संचांचे वितरण महाग दराने केल्यामुळे जिल्हा-ठाणे येथे संबंधित दुकानदारावर जीवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, जिल्हा-जळगांव येथे प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार संबंधित दुकानदारास नोटीस बजावण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय महामार्गावर आपत्कालीन यंत्रणा उपलब्ध करून देण्याबाबत

**(४५) * ४९८३५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.योगेश सागर (चारकोप), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील अंतर्गत रस्त्याची (सर्विस रोड) दुरवस्था झाली असून या महामार्गावर कोल्हापूर नाका येथे तसेच पुणे-सातारा हायवेच्या लगत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाल्यामुळे वाहतूक कोंडी होऊन आपत्कालीन परिस्थितीत यंत्रणा वेळेत दाखल होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर नाका येथे उड्डाणपुलाचा प्रस्ताव मंजूर झालेला असून अद्यापही काम सुरु न झाल्याने वाहतूक कोंडी व अपघात होत असून अपघातातील जखमींवर उपचारास दिरंगाई होऊन मृत्यू होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या राष्ट्रीय महामार्गावर तातडीने आपत्कालीन यंत्रणा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सुविधा उपलब्ध करून सदर रस्त्याची दुरुस्ती व अतिक्रमण हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) व (२) हे खरे नाही.

पुणे बंगळूर राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

पुणे बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील अंतर्गत रस्त्याची सर्व्हिस रोड पावसाळयात काही ठिकाणी खराब झाले होते. महामार्गाच्या दोन्ही बाजूस नागरीकरण वाढल्यामुळे व सेवा रस्त्याच्या दोन्ही बाजूस नागरीकांनी भराव केल्यामुळे पाण्याचा निचरा होण्यास अडचण होऊन ब-याच ठिकाणचे सेवा रस्ते खराब होतात. उद्योजकाकडून सेवा रस्त्यावरील आवश्यक त्या ठिकाणी डांबरीकरण केल्यामुळे सर्व्हिस रोड सुस्थितीत असून वेळोवेळी देखभाल दुरुस्ती केली जाते.महामार्गावरील काही ठिकाणी रस्त्याच्या हद्दीत असणारी अतिक्रमणे काढण्यात आले असून उर्वरीत अतिक्रमणे काढणे प्रगतीत आहे.

NHAI Portal वरील Toll Free Help line No. १०३३ वरुन महामार्गावरील गस्त पथकास आवश्यक ते निर्देश दिले जातात. Route Patrolling, रुग्णवाहिका पथक (Ambulance Team) सर्व आवश्यक त्या उपाययोजनेसह दुर्घटना स्थळी दाखल होते. गरजेनुसार आपत्कालीन परिस्थितीत संबंधित वाहतूक पोलिस विभागाच्या मदतीने त्वरित कारवाई केली जाते व कमीत कमी वेळेत अपघातग्रस्तांना रुग्णालयात हलविले जाते.

(३) उदयोजकाकडून रस्त्याची देखभाल व दुरुस्ती चांगल्या प्रकारे करण्यात येत आहे. तसेच महामार्गाच्या हद्दीतील अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही पोलीस यंत्रणेच्या मदतीने युध्दपातळीवर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट नसणाऱ्या जिल्ह्यात तांदुळाचा पुरवठा बंद करण्यात येणार असल्याबाबत

**(४६) * ५०१८६ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अन्न सुरक्षाकायदा अंतर्गत बुलडाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ, अमरावती, औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, लातूर, हिंगोली, उस्मानाबाद व इतर आत्महत्याग्रस्त अवर्षणग्रस्त जिल्ह्यांचा समावेश करून त्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना स्वस्त दरात धान्य देण्याची योजना शासनाने कार्यान्वित केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना अल्पदरात गहू देण्याची योजना गत सहा महिन्यांपासून बंद असल्याचे तसेच सदरहू शेतकऱ्यांना पंतप्रधान गरीब कल्याण योजनेचा देखील लाभ मिळत नसल्याचे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालिन शासनाच्या काळात मा. अन्न नागरी पुरवठा मंत्री यांनी या योजनेतील भारतीय खाद्य निगमकडून पुरवठा होणारा गहू व तांदुळ बंद करून सदर योजनेसाठी लागणारा गहू खाजगी व्यापाऱ्याकडून घेण्याच्या निविदा काढल्या असून सदर निविदा प्रक्रिया पूर्ण न झाल्याने या शेतकऱ्यांना धान्याचे वाटप बंद असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजना पुन्हा सुरू करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे लेखी स्वरूपात दिनांक २८ ऑगस्ट,२०२२ वा त्या सुमारास केली आहे तसेच याबाबत बुलढाणा जिल्ह्यातील गव्हासाठी 'भारतीय खाद्य निगम''कडे जून/जुलै महिन्यासाठीच्या धान्याचा सात ते आठ कोटी रुपयांचा भरणा केलेला होता त्या रकमेच्या मोबदल्यात जिल्ह्याला गव्हाचा पुरवठा झाला आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू योजना पूर्ववत सुरु करुन लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा या १४ जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिका असणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर सवलतीच्या दराने अन्नधान्याचा पुरवठा करण्याची शेतकरी योजना कार्यान्वित आहे.

(२) अंशत: खरे आहे. एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांसाठी उचल करीत असलेल्या Non-NFSA योजनेंतर्गत गहू उपलब्ध होणार नसल्याचे भारतीय अन्न महामंडळाने त्यांच्या दि. ३१.५.२०२२ च्या पत्रान्वये कळविले असल्याने शेतकरी योजनेंतर्गत गहू उपलब्ध झालेला नाही. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेचा लाभ सदर शेतकरी योजनेतील लाभार्थ्यांना अनुज्ञेय नाही.

(३) शेतकरी योजनेंतर्गत आवश्यक अन्नधान्याची खरेदी खुल्या बाजारातून करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) होय. शेतकरी योजनेंतर्गत अन्नधान्याचे वितरण सुरु होण्याबाबत विविध स्थानिक लोकप्रतिनिधींकडून निवेदने प्राप्त झाली आहेत.

जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा यांनी माहे जून व जुलै, २०२२ करिता आवश्यक असलेल्या गव्हाकरिता ₹६.५५ कोटी इतकी रक्कम भारतीय अन्न महामंडळाकडे जमा केली आहे. त्यानुसार माहे जून, २०२२ करिता आवश्यक १४८८० क्विंटल गव्हापैकी १३३५.२० क्विंटल गव्हाची उचल करण्यात आली आहे. तद्नंतर भारतीय अन्न महामंडळाने त्यांच्या दि. ३१.५.२०२२ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार सदर योजनेंतर्गत गहू उपलब्ध झालेला नाही.

(५) एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांसाठी आवश्यक अन्नधान्याची उचल केंद्र शासनाच्या Non-NFSA योजनेंतर्गत करण्यात येत होती. तथापि, सदर योजनेंतर्गत अन्नधान्याची उचल थांबविण्यात येत असल्याचे भारतीय अन्न महामंडळाने कळविले आहे. त्यानुषंगाने शेतकरी योजनेंतर्गत आवश्यक अन्नधान्याची खरेदी खुल्या बाजारातून करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.